| धाराशिव | वर्ष २५ वे | अंक २२० वा | गुरूवार दिनांक १३ नोव्हेंबर, २०२५ | पृष्ठे ६ | किंमत ०१ ₹

RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## जिल्हा बँकेला ७४ कोटींचे शासकीय अर्थसहाय्य राज्य मंत्रिमंडळाचा जिल्ह्यासाठी मोठा निर्णय

### आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या मागणीला राज्य सरकारचे पाठबळ



धाराशिव (रामेश्वर डोंगरे)- धाराशिव जिल्हा सहकारी बँकेला नवसंजीवनी देण्यासतठी राज्य सरकारने ७४ कोटी रुपयांचे अर्थसहाय्य देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय मंगळवारी घेतला आहे. ऑक्टोबर महिन्यात आपण स्वतः मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडे बँकेला अतिवृष्टी आणि महापुराच्या पार्श्वभूमीवर तातडीने आर्थिक मदत करावी, अशी पत्राद्वारे मागणी केली होती. त्यानुसार राज्य सरकारने ७४ कोटी रुपयांचे अर्थसहाय्य जिल्हा बँकेला देण्याचा निर्णय घेतला असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

अभुतपूर्व अतिवृष्टीमुळे जिल्ह्यातील शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. अनेकांच्या शेतजमीनी खरवडून गेल्या आहेत. खरीप हंगाम हातातून गेला आहे. अशा वेळी आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकरी बांधवांना दिलासा मिळावा यासाठी जिल्हा बँकेच्या माध्यमातूनच पतपुरवठा होणे अत्यंत गरजेचे असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिलेल्या पत्रात म्हटले होते. होमट्रेड रोखे घोटाळ्यामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांची आर्थिक नाडी असलेली धाराशिव जिल्हा बँक प्रचंड अडचणीत सापडली आहे. ४४० कोटी रुपयांच्या ठेवी देणारे तब्बल सहा लाख ठेवीदार आर्थिक अडचणीच्या कात्रीत अडकले आहेत. सन २००२ पासून म्हणजेच मागील तब्बल २३ वर्षांपासून जिल्हा बँकेतून शेतकरी बांधवांना कर्जपुरवठा चक्क बंद आहे. परिणामी जिल्ह्यातील शेतकऱ्यांना कर्जासाठी मोठ्या प्रमाणात खाजगी सावकारीच्या जोखडातून जावे लागत आहे. कर्जाच्या रकमेची थकबाकी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. त्यामुळे दैनंदिन व्यवहारासाठी आवश्यक असलेल्या चलनाचाही सध्या जिल्हा बँकेत मोठ्या प्रमाणात तुटवडा असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या निदर्शनास आणून दिले.

वरील सर्व बाबींचा विचार करता सध्याच्या अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर धाराशिव जिल्हा बँकेला तातडीने आर्थिक मदत करावी अशी मागणी जिल्ह्यातील सर्व शेतकरी बांधवांच्यावतीने मुख्यमंत्री महोदयांकडे केली होती. धाराशिव जिल्हा बँकेला गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी या मागणीचा जलदगतीने विचार करण्यात यावा असेही आपण मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना दिलेल्या पत्रात नमूद करण्यात आले असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले आहे. शेतकरी बांधवांच्याहिताच्या दृष्टीने अत्यंत संवेदनशीलपणे हा निर्णय घेतल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार आणि महायुती सरकारचे सर्व मंत्री यांचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी जिल्ह्यातील शेतकरी बांधवांच्या वतीने आभार मानले आहेत.

## गुंजोटीत इंद्रधनु वृद्ध सेवा केंद्राचा ३० वा वर्धापन दिन उत्साहात साजरा



उमरगा (प्रतिनिधी)- तालुक्यातील चौरस्ता येथील इंद्रधनु वृद्ध सेवा केंद्राचा ३० वा. वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या अध्यक्ष डॉ. दामोदर पतंगे होते. प्रमुख उपस्थिती उमरगा लोहारा तालुक्याचे आमदार प्रवीण स्वामी, युवा नेत्या आकांक्षा चौगुले, ड. प्रदीप शहा डॉ. मुलचंद आडवाणी ड. प्रवीण तोतला, अनिल सगर, गोटोपंत खरोसेकर, श्रीकृष्ण शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष प्रभाकर हिरवे, जिल्हा अध्यक्ष संताजी चालुक्य उपस्थित होते.

जागतिक वृद्ध दिना निमित्त आदर्श जेष्ठांचा सत्कार. प्रतिवर्षी समाजात उत्तम कामगिरी करणारे समाजाला ज्यांचा वेळोवेळी उपयोग होतो. जे केवळ समाजहितासाठीच जगतात. त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून आदर्श ज्येष्ठ नागरिक पुरस्कार दिला जातो. ते पुरस्कार भूविकास बँकेचे माजी चेअरमन बलभी मराव पाटील यांना देण्यात आला. सपत्निक त्यांचा मानपत्र देऊन सन्मान करण्यात आला.

शब्द-सुरांची सुरेल मैफल रंगली... काळजाचा काळजाशी थेट संवाद. शब्दसुरांची सुरेल मैफल घेण्यात आली. तालमणी खंडेराव मुळे यांनी भक्तीगीत, भावगीत, शेरो-शायरी सादर केले. तबल्याची साथ प्रा. विशाल सोमवंशी यांनी दिले. तर निवेदन प्रा. शैचास महामुनी यांनी केले. या कार्यक्रमाला श्रीकृष्ण वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गुलाब राठोड, उपप्राचार्य कल्ल य्या स्वामी, प्रशालेचे मुख्याध्यापक रविराज पाटील, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक दत्ता गायकवाड, प्रशालेचे उपमुख्याध्यापक सत्यवान भालेराव, पर्यवेक्षक अविनाश पाटील, डॉ. अंबिका पतंगे डॉ. राजेंद्र कानडे डॉ. विजय बेडदुर्गे, शैलाताई पतंगे अमर देशटवार तसेच सेवा केंद्रातील सर्व जेष्ठ मंडळी व परिसरातील व्यक्ती बहुसंख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अस्मिता विश्वस्त मंडळाचे सचिव प्रा. अभयकुमार हेरास यांनी केले उपस्थितांचे आभार प्रा. मारुती खमितकर यांनी मानले.

## क्राईम न्युज

### शस्त्र कायद्यांतर्गत गुन्हा नोंद

परंडा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत इंद्रजीत अ रा. मुंगशी ता. माढा,वैभव महावीर . पटवर्धन कुरेली ता. पंढरपुर, अजिनाथ रा. पंढरपुर ता. पंढरपुर यांनी दि.११.११.२०२५ रोजी इंडीयन ऑईल पेट्रोलपंपा जवळ कुर्डवाडी रोड येथे लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल असे एक लोखंडी कोयता व चाकु सह वाहन क्र एमएच १२ सीडी १६७२ मध्ये विनापरवाना बेकायदेशीर रित्या स्वत:चे जवळ बाळगलेला परंडा पोलीसांना मिळून आला. यावर पथकाने नमुद तलवार जप्त करुन फिर्यादी नामे-भुजंग सुखदेव अडसुळ पोलीस अंमलदार नेमणुक परंडा पोलीस ठाणे यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन शस्त्र कायदा कलम- ४/२५ सह ३(५) भा.न्या.सं. सह १३५ म.पो. का. अन्वये परंडा पो. ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

### धाराशिवातून दोन मोटारसायकलची चोरी

धाराशिव (प्रतिनिधी)- आनंदनगर पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी शिवाजी ज्ञानदेव लक्षे, वय ६० वर्षे, रा.वाघोली ता.जि. धाराशिव यांची पॅशन प्रो मोटरसायकल अंदाजे २५,००० किंमतीची व अनिल किसनराव पवार, यांची मोटरसायकल अंदाजे ३०,००० किंमतीच्या दोन मोटरसायकल बसस्थानक धाराशिव व शिवाजी नगर सांजा रोड धाराशिव येथुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेल्या. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- शिवाजी लक्षे यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन आनंदनगर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२), अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### म्हैस गेली चोरीला

तुळजापूर(प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी दगडू रावसाहेब डोंगरे, वय ७५ वर्षे, रा. मंगरुळ ता. तुळजापूर जि. धाराशिव यांची अंदाजे ६०,००० किंमतीची एक म्हैस दि.०५.११.२०२५ रोजी शेत गट नं ६१८ मध्ये गोठ्यासमोरुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-दगडु डोंगरे यांनी दि.११.११.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तुळजापूर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### जिप धोकादायकरीत्या उभी केली गुन्हा दाखल

कळंब (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत संतोष रा. बाबानगर कळंब ता. कळंब जि. धाराशिव यांनी दि.११.११.२०२५ रोजी .आपल्या ताब्यातील टाटा सुमो जिप ही होळकर चौक ते छत्रपती शिवाजी महाराज चौक कळंब येथे सार्वजनिक रस्त्यावर रहदारीस धोकादायकरीत्या उभे केलेले असताना कळंब पोलीसांना मिळून आले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन नमूद व्यक्तीविरुध्द भारतीय न्याय सहिंता कलम २८५ मोवाका अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## परमहंस महाविद्यालयात गोल्डन रिडर्स ज्येष्ठांसाठी सुवर्ण वाचन मोहीम सुरू




धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)- मोबाइलच्या युगात आज नवनवीन तंत्रज्ञान जरी वाढत असले तरी दुसरीकडे मात्र वाचन संस्कृती नष्ट होत चालली आहे. पूर्वी ज्यावेळी मोबाइल अस्तित्वात नव्हते किंवा त्याहूनही जुन्या पिढीचे लोक सतत वाचन करत होते. त्यावेळी वृत्तपत्रे, विविध वैचारिक ग्रंथासह संस्कृती सभ्यतेवर आधारित ग्रंथ, चरित्र ग्रंथ असा वाचनीय खजिना त्यांच्याजवळ राहायचा. आज वाचन केलेली मंडळी वाचनातून आलेले विचार समाजात मांडत असत. म्हणजे वाचनामुळे वक्तृत्व कौशल्य आत्मसात होते. म्हणूनच रामकृष्ण परमहंस महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागातर्फे ज्येष्ठ नागरिकांसाठी गोल्डन रिडर्स ज्येष्ठांसाठी सुवर्ण वाचन मोहीम सुरू केली आहे. जेणेकरून ज्येष्ठांचा आदर्श घेऊन भावी पिढीत वाचन संस्कृती समृद्ध होईल, असे प्रतिपादन महाविद्यालय विकास समितीचे सदस्य तथा प्रमुख पाहुणे नानासाहेब पाटील यांनी केले.

ज्येष्ठ नागरिकांसाठी गोल्डन रिडर्स ज्येष्ठांसाठी सुवर्ण वाचन मोहिमेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संदीप देशमुख, ग्रंथालय प्रमुख डॉ. मदनसिंग गोलवाल, डॉ. टी. एल. बारबोले, डॉ. मंगेश भोसले, डॉ. अरविंद हंगरगेकर यांची उपस्थिती होती.

धाराशिव शहरातील रामकृष्ण परमहंस महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागाच्या वतीने गोल्डन रिडर्स ज्येष्ठांसाठी सुवर्ण वाचन मोहीम उपक्रमाचे उद्घाटन ज्येष्ठ नागरिकांसह प्रमुख पाहुणे नानासाहेब पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी डॉ. टी. एल. बारबोले, डॉ. मंगेश भोसले, डॉ. अरविंद हंगरगेकर यांच्यासह सर्व शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमासाठी ग्रंथालयप्रमुख डॉ. मदनसिंग गोलवाल यांनी पुढाकार घेतला. धाराशिमध्ये रामकृष्ण परमहंस महाविद्यालयात ज्येष्ठ नागरिकांसाठी मोफत ग्रंथालयाची सुविधा उपलब्ध करून दिली आहे.

ज्येष्ठ नागरिकांसाठी नि:शुल्क सदस्य नोंदणी रामकृष्ण परमहंस महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागातर्फे जेष्ठ नागरिकांसाठी गोल्डन रिडर्स ज्येष्ठांसाठी सुवर्ण वाचन मोहीम सुरू केली अहे याचे सदस्य बनण्यासाठी ज्येष्ठ नागरिकांनी आपले स्वत:चे आधार कार्ड, मतदान कार्ड व फोटो आणणे आवश्यक आहे. ही कागदपत्रे आणल्यास मेंबरशिप दिली जाते. त्यानंतर ग्रंथालयातील हव्या त्या पुस्तकांचे वाचन तेथे बसूनच अथवा घरी नेण्यासाठी देखील पुस्तकांची देवाण-घेवाण करता येणार आहे. राज्यातील हा अनोखा प्रयोग असल्याने या उपक्रमाचे ज्येष्ठ नागरिकांनी कौतुक होत आहे. पुस्ताकंममध्ये आध्यात्मिक, पौराणिक, कथा कादंबरीसह मराठी सारस्वत कोश, ज्ञानेश्वरी, कुराण, बायबलसह, महाभारत, संत तुकाराम अभंग असे अनेक ग्रंथ उपलब्ध आहेत.

## खंडणीची मागणी करून दिली धमकी:गुन्हा दाखल


धाराशिव (प्रतिनिधी)- वाशी तालुक्यातील जवळका शिवारात पवनचक्कीचे साहित्य घेऊन जाणाऱ्या तीन कंटेनर वाहनांना रस्त्यावर अडवून, ती सोडवण्यासाठी ९ लाख रुपयांची खंडणी मागितल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. संबंधितास खंडणी न दिल्यास वाहने जाळून टाकण्याची धमकीही दिली. याप्रकरणी वाशी पोलीस ठाण्यात तिघांविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांखाली १० नोव्हेंबर रोजी गंभीर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या बाबत समजलेली माहिती अशी की, फिर्यादी महादेव मनोहर चेडे (५६, रा. वाशी) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, ८ नोव्हेंबरच्या रात्री ९ वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. सेरेंटिका रिन्युएबल प्रा. लि. या कंपनीचे पवनचक्की सबस्टेशनचे सामान घेऊन जाणारे कंटेनर (क्र. एमएच.४०-बीएल. ८८७९, जीजे.१२-बीवाय. २३०० आणि एमएच. ४६-बीएफ. ९८२२) हे जवळका शिवारातून दहिफळ येथील सबस्टेशन पॉईंटकडे जात होते.

यावेळी, हनुमंते, रुपेशे आणि शैलेश (सर्व रा. जवळका) या तिन्ही तिघांनी रस्त्यावर कंटेनर आडवले. करारनामा प्रमाणे कंपनीने रक्कम दिलेली असतानाही, तिघांनी अडवलेली वाहने सोडवण्यासाठी फिर्यादीकडे थेट नऊ लाख रुपये खंडणीची मागणी केली. यावेळी, संबंधितांनी फिर्यादीला शिवीगाळ करत, जर पैसे दिले नाहीत तर वाहने जाळून टाकीन, अशी गंभीर धमकी दिली.

या प्रकारानंतर, फिर्यादी महादेव चेडे यांनी दिनांक १० नोव्हेंबर २०२५ रोजी वाशी पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार नोंदवली. वाशी पोलिसांनी तिघांविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०८(४) (खंडणीसाठी धमकी), १२६(२) (अनुचित अवरोध), ३५२ (शांतता भंग करण्याच्या उद्देशाने अपमान), ३५१(२), ३५१(३), ३५१(४) (आपराधिक धमकी) आणि ३(५) या कलमांखाली गुन्हा दाखल केला आहे.

## शाकंभरी नवरात्रोत्सवास२८ डिसेंबर रोजी प्रारंभ



तुळजापूर (प्रतिनिधी)- तुळजाभवानी मातेचा छोटा दसरा म्हणून ओळखल्या जाणारा शाकंभरी नवरात्र महोत्सवास २८ डिसेंबर रोजी घटस्थापनेने प्रारंभ होत आहे. तर ०३ जानेवारी २६ - शाकंभरी पोर्णिमेला शाकंभरी नवरात्रोत्सवाची पुर्णाहूतीने सांगता होईल. शाकंभरी नवरात्र महोत्सवातील मुख्य आकर्षण जलयात्रा - ३१ डिसेंबर ला असणार आहे. दरम्यान गुरुवार (दि. १३) जिल्हाधिकाऱ्यांचा अध्यक्षतेखाली बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

तुळजाभवानी मातेचा शाकंभरी नवरात्र महोत्सव २० डिसेंबर ते ४ जानेवारी या कालावधीत साजरा करण्यात येणार आहे. २० डिसेंबर रोजी मातेचा मंचकी निद्रेला प्रारंभ होणार आहे तर २८ डिसेंबर रोजी पहाटे तुळजाभवानी माता मंचकी निद्रा संपवून सिंहासनावर विराजमान होणार आहे. शारदिय नवरात्र महोत्सवा प्रमाणेच शाकंभरी नवरात्र महोत्सवात घटस्थापना, तुळजाभवानी मातेचा विविध अलंकार पुजा, दररोज रात्री छबिना मिरवणूक आदी विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत असते. शाकंभरी पोर्णिमेला ओवरीतील होमकुंडात आहुती नंतर घटोत्थापनाने नवरात्राची सांगता होते. तुळजाभवानी मातेचा मंचकी निद्रेने प्रारंभ होणाऱ्या नवरात्र महोत्सवाची शाकंभरी पोर्णिमेला अन्नदान, महाप्रसादाने सांगता होईल.

मुख्य आकर्षण जलयात्रा शाकंभरी नवरात्र महोत्सवा तील प्रमुख आकर्षण जलयात्रा २८ डिसेंबर सकाळी ०७ वाजता काढण्यात येणार आहे. शेकडो महिला पापनाश तीर्थ येथील इंद्रायणी कुंडातील पवित्र जल - जलकुंभातून डोक्यावर वाजत गाजत आणून तुळजाभवानीच्या चरणावर वाहतात. जलयात्रेचा सोहळ्यात मोठ्या संख्येने भाविक सहभागी होतात. जलयात्रेनंतर भव्य अन्नदान महाप्रसादाचे आयोजन करण्यात येत असते.

## होर्टीच्या आश्रम शाळेत भरली विठ्ठल नामाची शाळा



जळकोट (विजय पिसे)- तुळजापूर तालुक्यातील होर्टी येथे दिनांक ११ नोव्हेंबर २०२५ रोजी महात्मा फुले शिक्षण प्रसारक मंडळ जळकोट संचलित, इंदिरा गांधी प्राथमिक व माध्यमिक आश्रम शाळा होर्टी येथे श्री वैष्णव वारकरी शिक्षण संस्था पंढरपूर अंतर्गत आज आश्रम शाळेत शालेय शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांना धार्मिक शिक्षण व संस्काराची गरज ओळखून महात्मा फुले शिक्षण प्रसारक मंडळ जळकोट चे सचिव तथा प्राचार्य संतोष चव्हाण साहेब व इंदिरा गांधी माध्यमिक आश्रम शाळेचे मुख्याध्यापक श्री विनायक राठोड सर व प्राथमिक आश्रम शाळेचे मुख्याध्यापक श्री शिवाजी कवठे सर यांनी कीर्तनाचे आयोजन केले होते व अनेक प्रकारचे भजन केले यावेळी विठ्ठल व माऊलीच्या जय घोषाने शिक्षक विद्यार्थीही भजनात मंत्रमुग्ध झाले होते यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष महात्मा फुले शिक्षण प्रसारक मंडळ जळकोट चे अध्यक्षा मातोश्री चंचलादेवी चव्हाण प्रमुख पाहुणे होर्टी येथील सामाजिक कार्यकर्ते दत्ता राजमाने साहेब, व उमाकांत माळी सर, बाळू आमले सर,ज्योतिराम मुगळे सर,शंकर थाटे सर, शिवशंकर बिराजदार सर, कार्यक्रमाची सांगता पसायदानाने करण्यात आले यावेळी गावकरी ,शिक्षकेतर कर्मचारी विद्याथी उपस्थित होते.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## सुशिक्षितांचा दहशदवाद; चिंतेची बाब

सोमवारी सायंकाळी लाल किल्ल्यासमोर हरियाणा पासिंगच्या आय-२० कारमध्ये झालेला तीव्र क्षमतेचा स्फोट हा दहशतवादी हल्लाच होता, यावर केंद्रीय तपास यंत्रणा आणि दिल्ली पोलिसांनी शिक्कामोर्तब केले आहे. रात्रभर केलेल्या कसून चौकशीनंतर फॉरेन्सिक सायन्स लॅबच्या अहवालाच्या आधारे दिल्ली पोलिसांनी मंगळवारी सकाळी अधिकृतपणे ही घटना सुशिक्षितांचा दहशतवादी कारस्थान असल्याचे स्पष्ट होते. स्फोटके आणि 'जैश' मॉड्यूलशी संबंधित अटक केलेल्या चारही डॉक्टरांचा यामध्ये सहभाग असल्याचे उघड होत आहे. केंद्रीय यंत्रणांच्या माहितीनुसार, गुजरात एटीएस, जम्मू-काश्मीर पोलिस, फरिदाबाद पोलिस आणि दिल्ली पोलिसांनी अटक केलेल्या पाकिस्तानी दहशतवादी संघटना 'जैश-ए-मोहम्मद'च्या दहशतवाद्यांच्या चौकशीतून हा निष्कर्ष काढण्यात आला आहे. या दहशतवाद्यांचे मोबाईल कॉल डिटेल्स आणि सीसीटीव्ही फुटेजच्या तपासणीतून तपास यंत्रणा मोठ्या प्रमाणावर अंतिम निष्कर्षापर्यंत पोहोचल्या आहेत. दरम्यान, सोमवारी संध्याकाळी झालेल्या स्फोटाच्या घटनेचा तपास राष्ट्रीय तपास यंत्रणेकडे सोपविण्यात आला आहे. घटनेतील मृतांची संख्या १२ झाली आहे. प्रत्यक्षात ती जास्त असावी, असा संशय व्यक्त होत आहे. 'जैश' मॉड्यूलचा पर्दाफाश करताना आतापर्यंत पाच डॉक्टरांना अटक करण्यात आली आहे. सुरुवातीला जम्मूतून डॉ. आदिल राथेरला अटक करण्यात आली. त्याने दिलेल्या माहितीनुसार, डॉ. मुझम्मिल गनाई, डॉ. शाहीन सईद या दोघांसह आणखी काही साथीदारांना सोमवारीच अटक करण्यात आली. त्यांच्याकडून मोठ्या प्रमाणात स्फोटके आणि शस्त्रास्त्रे जप्त करण्यात आली. त्यापूर्वी डॉ. अहमद मोईद्दीन सय्यदला अटक करण्यात आली आहे, तर डॉ. उमर मोहम्मद हा स्फोटातील कार चालवत होता. हे सर्व 'जैश' मॉड्यूलशी संबंधित होते. दरम्यान, या स्फोटामुळे दहशतवाद्यांची नवीन 'मोडस ऑपरेंडी' समोर आली असून, अमोनियम नायट्रेट आणि इंधन तेलाच्या माध्यमातून स्फोट घडविण्याचा नवा प्रकार समोर आला आहे. अटकेतील डॉ. शाहीन सईदच्या नातेवाईकांकडे पोलिसांनी चौकशी केली. आणखी काहीजणांना ताब्यात घेण्यात आले आहे. मुझम्मिल हा मूळचा पुलवामातील कोईल येथील आहे, तर डॉ. शाहीन लखनौ येथील आहे. या दोघांना सोमवारीच जेरबंद केले आहे. दरम्यान, स्फोटातील कार चालवणाऱ्या डॉक्टर उमरच्या आईला स्फोटस्थळी सापडलेल्या शरीराच्या अवयवांशी 'डीएनए' नमुने जुळवण्यासाठी घेऊन गेलो आहोत, असे एका अधिकाऱ्याने सांगितले.सोमवारी लाल किल्ला मेट्रो स्टेशनच्या पार्किंग क्षेत्राजवळ झालेल्या स्फोटात वापरलेली कार डॉक्टर उमर नबी चालवत होता, असे स्पष्ट झाले आहे. जम्मू आणि काश्मीर, हरियाणा आणि उत्तर प्रदेशमध्ये सुरू असलेल्या दहशतवादविरोधी मोहिमेत एका राज्याबाहेरील दहशतवादी मॉड्यूलचा पर्दाफाश करण्यात आला. त्यात चार डॉक्टर आणि एका मृत सदस्यासह अनेक संशयितांना अटक करण्यात आली आहे. जम्मू आणि काश्मीर पोलिस, हरियाणा पोलिस, उत्तर प्रदेश पोलिस आणि केंद्रीय एजन्सींच्या संयुक्त पथकांनी श्रीनगर, फरिदाबाद, सहारनपूर आणि इतर ठिकाणी संयुक्त छापे टाकून स्फोटके, बंदुका आणि बॉम्ब बनवण्याचे साहित्य मोठ्या प्रमाणात जप्त केले आहे. या सर्वांचा 'जैश-ए-मोहम्मद'शी संबंध असल्याचे स्पष्ट झाले आहे. पोलिसांनी ही 'व्हाईट कोट टेरर इको-सिस्टीम' शोधून काढली. यातील सर्वजण शैक्षणिक आणि व्यावसायिक नेटवर्कच्या नावाखाली काम करणारे कट्टरपंथी व्यावसायिक आहेत. १९ ऑक्टोबर रोजी श्रीनगरच्या बनपोरा नौगाम भागात 'जैश-ए-मोहम्मद' (जेईएम) चे पोस्टर्स दिसल्यानंतर तपास सुरू झाला, ज्यामध्ये सुरक्षा दलांना धमकी देण्यात आली होती. पोलिसांनी एक 'व्हाईट कोट टेरर इको-सिस्टीम' शोधून काढली, ज्यामध्ये शैक्षणिक आणि व्यावसायिक नेटवर्कच्या नावाखाली काम करणारे कट्टरपंथी व्यावसायिक आणि विद्यार्थी यांचा समावेश होता, जो निधी, शस्त्रे आणि स्फोटके हलविण्यासाठी एन्क्रिप्टेड चॅनल आणि धर्मादाय आघाड्यांद्वारे समन्वय साधत होता. पहिला डॉ. मुझम्मिल गनाई हा काश्मीरमधील पुलवामा येथील कोईल येथील ३५ वर्षीय डॉ. मुझम्मिल गनाई हा फरिदाबादमधील अल फलाह विद्यापीठाच्या रुग्णालयात डॉक्टर म्हणून काम करत होता. तो एमबीबीएस विद्यार्थ्यांसाठी अध्यापन करत होता. त्याच्या अटकेनंतर, पोलिसांनी फरिदाबादमधील धौज येथील त्याच्या भाड्याच्या घरातून ३५८ किलो अमोनियम नायट्रेट, तीन मॅगझिनसह एक क्रिन्कोव्ह असॉल्ट रायफल, ९१ जिवंत काडतुसे, काडतुसासह एक पिस्तूल, टायमर, बॅटरी, रिमोट कंट्रोल, वायर, धातूचे पत्रे आणि इतर बॉम्ब बनवण्याचे साहित्य जप्त केले. विद्यापीठाच्या प्रयोगशाळेचा आणि संबंधित सुविधांचा वापर स्फोटके साठवण्यासाठी केला जात असावा, असे प्राथमिक तपासात असे दिसून आले आहे.दुसरे डॉ. आदिल राथेर हे काश्मीरमधील डॉ. आदिल राथेरला उत्तर प्रदेशातील सहारनपूर येथून अटक करण्यात आली. डॉ. आदिल हा डॉ. मुझम्मिल आणि डॉ. उमर यांच्यासोबत अल फलाह विद्यापीठातही काम करत होता. तपासकर्त्यांना जीएमसी श्रीनगर येथील त्याच्या लॉकरमधून एके-४७ रायफल जप्त करण्यात आली आणि तो स्फोटके, शस्त्रे आणि बॉम्ब बनवण्याचे साहित्य जमा करण्यात गुंतलेल्या फरिदाबाद दहशतवादी मॉड्यूलचा भाग होता.तिसरे डॉ. शाहीन सईद हे लखनौ येथील एक डॉक्टर आणि डॉ. मुझम्मिलची कथित प्रेयसी आहे. तिला चौकशीसाठी विमानाने श्रीनगरला आणण्यात आले. डॉ. मुझम्मिलच्या अटकेनंतर घाबरलेल्या शाहीन सईदने रायफल कचऱ्याच्या डब्यात टाकून दिली होती. पोलिसांनी फरिदाबादमध्ये तिच्या कारमधून एक असॉल्ट रायफल जप्त केली. डॉ. शाहीनने फरिदाबादमध्ये डॉ. मुझम्मिल आणि डॉ. आदिल यांच्यासोबत काम केले होते, काश्मीरमधील नेटवर्कशीही संबंध ठेवला होता. तसेच, मसूद अझहरच्या बहिणीशी संबंध वाढवून भारतात महिला दहशतवाद्यांचे नेटवर्क उभारण्यात ती गुंतल्याचा संशय आहे.चौथे डॉ. उमर मोहम्मद हा काश्मीरमधील पुलवामा येथील आहे. डॉ. मुझम्मिल आणि डॉ. आदिल यांच्यासोबत अल फलाह विद्यापीठाच्या टीममध्ये त्याचा भाग होता. डॉ. उमर फरार होता आणि पोलिस त्याच्या अटकेचा सक्रियपणे शोध घेत होते. पाचवे डॉ. अहमद मोईद्दीन सय्यद हेचीनमधून एमबीबीएस पदवी घेतलेल्या हैदराबाद येथील डॉ. अहमद मोईद्दीन सय्यदला गुजरात एटीएसने ८ नोव्हेंबर रोजी अटक केली. डॉ. सय्यद राजेंद्रनगरमध्ये शोरमा व्यवसाय चालवत होता. परंतु, सोशल मीडिया आणि टेलिग्रामद्वारे तो कट्टरपंथी आणि चिथावणी देणाऱ्या पोस्ट करत होता आणि इतरांना कट्टरपंथी बनवत होता. सुशिक्षितांच्या दहशदवादेत वाढ होत आहे. शिकलेली मंडळी हा इतरांना बदनाम करीत आहे. त्यामुळे सर्वांनी सावध झाले पाहिजे.

# रामेश्वर येथील विश्वधर्मी मानवता तीर्थ भवनात भगवान गौतम बुद्ध, छ. शिवाजी महाराज, राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या मूर्तीची स्थापना







**लातूर/प्रतिनिधी :** रयतेचे राजे आणि हिंदवी स्वराज्याचे निर्माते छत्रपती शिवाजी महाराज, विश्वाच्या कल्याणासाठीचे पंचशील तत्वज्ञान देणारे तथागत भगवान गौतम बुद्ध आणि मानव केंद्रबिंदू ठेवून खेड्यांच्या विकासातूनच राष्ट्र विकास होईल हा मूलमंत्र देणारे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचा आदर्श नव्या पिढीला प्रेरणादायी व्हावा आणि हाच आदर्श मानवातील स्नेहभाव वृद्धिंगत करण्यासाठी उपयोगी पडेल हे जाणून विश्वधर्मी प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड यांनी त्यांच्या मूर्तीची स्थापना रामेश्वर(रूई) येथे उभारण्यात आलेल्या 'विश्वधर्मी मानवता तीर्थ भवनात' केली.

विश्व शांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणे भारत व मानवता तीर्थ रामेश्वर (रूई) यांच्या संयुक्त विद्यमाने जगातील सर्वात मोठ्या आणि विस्तीर्ण दालन असलेल्या 'विश्वधर्मी मानवता तीर्थ भवन' या वास्तूमध्ये सत्य, शांती, अहिंसा, प्रेम आणि मानवतेचे मूर्तिमंत प्रतीक असलेल्या, मानवी इतिहासातील काही उत्तुंग व पथदर्शी व्यक्तिमत्वांच्या चैतन्यदायी प्रतिकांची या ठिकाणी प्रतिष्ठापना आणि पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी विश्वधर्मी मानवतातीर्थ भवन या वास्तूचे संकल्पक, संरचना, नियोजक व निर्मितीकार एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड, प्रगतिशील शेतकरी हभप काशीराम दा. कराड, ऋषिकेश कराड, माईर्स एमआयटीचे कुलसचिव डॉ. रत्नदीप जोशी, वरिष्ठ सल्लागार डॉ. संजय उपाध्ये, गिरीश दाते, संचालक डॉ. महेश थोरवे, दिलीप पाटील, विष्णू भिसे, सचिन मुंडे व योगेश पारखी उपस्थित होते.

यावेळी विश्वधर्मी प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड म्हणाले,"गौतम बुद्धांचे विश्वशांतीचा संदेश देणारे तसेच पंचशीलाचे तत्वज्ञान जगाला मार्गदर्शक ठरणारे आहे. दया, क्षमा, शांती, त्याग, सेवा, समर्पणाच्या विचारांमध्येच अखिल मानव जातीचे कल्याण सामावलं आहे. तसेच स्वत्व आणि स्वाभिमान यांची शिकवणूक देत पर्यावरण स्नेही राज्याची निर्मिती करणारे रयतेचे राजे व हिंदवी स्वराज्याचे निर्माते छत्रपती शिवाजी महाराज यांचा प्रेरणादायी आदर्श हाच मानवातील स्नेहभाव वृद्धिंगत करण्यासाठी उपयोगी आहे. भारतीय संस्कृतीचे वसुधैव कुटुंबकम व एकं सत विप्रा बहुदा वदंती हा संदेशच जगाला विनाशापासन वाचवू शकतो. हाच संदेश रामेश्वर रूई येथे साकारलेल्या एकमेवाद्वितीय अशा 'विश्वधर्मी मानवतातीर्थ भवना' च्या माध्यमातून संपूर्ण जगाला देण्याचा छोटासा प्रयत्न आहे."

डॉ. रत्नदीप जोशी म्हणाले,"जगामध्ये विद्वेषाची भावना वाढीस लागत असताना व्यक्ती व्यक्तींमधील सहसंवाद आणि स्नेहभाव वृद्धिगंत व्हावा यासाठी रामेश्वर रूई येथे विश्वधर्मी मानवता तीर्थ भवनाची संकल्पना डॉ. विश्वनाथ दा. कराड यांनी केली. त्याची निर्मिती हेच एक मोठे आद्भुत आश्चर्य आहे. ९० फ ूट रूंदीचा मधला सभागृहाचा भाग हा भारतातील एकमेव द्वितीय असून या सभागृहामध्ये शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक स्नेहभावाचे तसेच ग्रामीण जनतेची काळ्या मातीशी असलेली नाळ दिसून येते."

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचा साडेतीन फूटाचा अर्ध पुतळा विधिवत पूजन करुण बसविण्यात आला. तीन फूट सात इंचाचा अर्ध पुतळा हा पंचधातुंनी निर्मित केलेला असून त्याचे वजन १४४ किलो आहे. या मूर्तीला सुवर्ण जडीत करण्यात आले आहे. तसेच भगवान गौतम बुद्ध आणि राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची अप्रतिम व रेखीव मूर्तीची स्थापना करण्यात आली आहे.

## दयानंद विज्ञान महाविद्यालयात मेगा जॉब फेअर

**१७ नोव्हेंबर २०२५ ला न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय,मुंबई गृहविभाग महाराष्ट्र शासनद्वारा विविध पदांची भरती**




**लातूर/प्रतिनिधी :** येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित,दयानंद विज्ञान महाविद्यालय,लातूर व न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय,मुंबई गृहविभाग महाराष्ट्र शासन यांच्या वतीने दि.१७ नोव्हेंबर २०२५ रोजी मेगा जॉब फेअर -२०२५ चे आयोजन करण्यात आलेले आहे.दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी,उपाध्यक्ष अरविंदराव सोनवणे,ललितभाई शहा, रमेशकुमार राठी,सचिव रमेश बियाणी,संयुक्त सचिव विशाल लाहोटी,संस्थेचे शैक्षणिक विकास अधिकारी प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड,महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे यांच्या पुढाकारातून हा उपक्रम होणार आहे.या मेगा जॉब फेअर मध्ये एमएफव्ही प्रोजेक्ट इन महाराष्ट्रासाठी सीएमएस संगणक संस्थामार्फत असिस्टंट केमिकल ॲनालायझर व सायंटिफिक असिस्टंट सायबर आणि इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी या दोन पदांची भरती केली जाणार आहे.यामध्ये जवळपास ५०० हून अधिक पदांची भरती होणार आहे.यातील असिस्टंट केमिकल ॲनालायझर या पदासाठी शैक्षणिक अर्हता एम.एस्सी. रसायनशास्त्र तर सायंटिफिक असिस्टंट सायबर ॲन्ड आयटी पदासाठी बी.एस्सी. संगणकशास्त्र किंवा बी.सी.एस.आयटी किंवा बी.एस्सी.इलेक्ट्रॉनिक्स अशी आहे. तरी पदवी प्राप्त सर्व विद्यार्थ्यांनी आपला बायोडाटा व शैक्षणिक कागदपत्रांसह या मेगा जॉब फेअर -२०२५ साठी उपस्थित रहावे.अधिक माहितीसाठी समन्वयक डॉ.महेश करळे (८७८८०२९३७३),डॉ. रोहिणी शिंदे(९८२२७९७९३०) यांच्याशी संपर्क साधावा.

सदरील मेगा जॉब फेअर या संधीचा फायदा सर्व सुशिक्षित तरुणांनी घ्यावा,असे आवाहान दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी,उपाध्यक्ष अरविंदराव सोनवणे,ललितभाई शहा,रमेशकुमार राठी,सचिव रमेश बियाणी,संयुक्त सचिव विशाल लाहोटी,संस्थेचे शैक्षणिक विकास अधिकारी प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड,महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे व करिअर व प्लेसमेंट सेलचे समन्वयक डॉ.महेश करळे आणि सदस्य डॉ.आण्णाराव चौगुले,डॉ.रोहिणी शिंदे,प्रा.सुजाता काळे,प्रा.अनुराधा शिंदे आदिंनी केले आहे.

## सोमाणी विद्यालयाच्या श्रेयशची राष्ट्रीय ज्युदो स्पर्धेसाठी निवड



**लातूर/प्रतिनिधी :** येथील श्रीकिशन सोमाणी विद्यालयाचा इयत्ता दहावी मधील विद्यार्थी श्रेयश श्रीकांत शेळके याची राष्ट्रीय ज्युदो स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

पुण्याच्या बालेवाडीत नुकत्याच पार पडलेल्या राज्यस्तरीय शालेय ज्युदो स्पर्धेत १७ वर्षांखालील मुलांच्या वयोगटातून , ७३ किलो वजनी गेटमधून श्रेयशने प्रथम क्रमांक पटकावला होता. या यशामुळे श्रेयशची मणिपूरचे राजधानी इंफाळ येथे आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय ज्युदो स्पर्धेसाठी निवड झाली आहे. श्रेयश शेळके याने मिळवलेल्या या नेत्रदीपक यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. चेतन सारडा, सचिव कमलकिशोर अग्रवाल, कोषाध्यक्ष जयेश बजाज, शालेय समितीचे अध्यक्ष अतुल देऊळगावकर, मुख्याध्यापक रमाकांत स्वामी, पर्यवेक्षक गिरीश कुलकर्णी, सुनीता जाधव, राहुल पांचाळ यांच्यासह सर्व शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे. श्रेयशला क्रीडा शिक्षक रुपाली कांबळे, गोरख राठोड, माणिक हाके यांचे मार्गदर्शन लाभले.

## लातूर जिल्ह्यात एकल महिलांसाठी राबविली जाणार विशेष मोहीम

- रोजगार, स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न
- विविध शासकीय विभागांची लवकरच कार्यशाळा
- पुढील तीन महिन्यातील कृती कार्यक्रम निश्चित होणार




**लातूर/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील एकल महिलांना शासकीय योजनांचा लाभ देवून त्यांना स्वावलंबी बनविण्यासाठी जिल्हा प्रशासनामार्फत विशेष मोहीम राबविली जाणार आहे. या अंतर्गत रोजगार, स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. पुढील तीन महिन्यात या उपक्रमांतर्गत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती देण्यासाठी, कृती कार्यक्रम निश्चित करण्यासाठी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या सूचनेनुसार सर्व शासकीय विभाग प्रमुखांसाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात येणार आहे. जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये या अनुषंगाने जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

रोहयोच्या उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, जिल्हा नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी, जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब वाघ, जावेद शेख, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी संदीप यादव यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी यावेळी उपस्थित होते.

एकल महिलांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ देवून त्यांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनविण्यासाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. यासोबतच त्यांच्यासाठी रोजगार, स्वयंरोजगार विषयक प्रशिक्षण आयोजित करावीत. १ डिसेंबर २०२५ पासून या अनुषंगाने पुढील तीन महिन्यांसाठी विशेष मोहीम हाती घ्यावी, अशा सूचना जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी दिल्या.

# अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या योजनांची कार्यवाही सुरळीत सुरु

**लातूर/प्रतिनिधी :** अलीकडील काही दिवसांपासून मराठा समाजातील बेरोजगार युवकांसाठी अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांबाबत "महामंडळाचे कामकाज बंद झाले आहे, व्याज परतावा थांबविण्यात आला आहे" अशा प्रकारच्या निराधार अफवा काही व्यक्तींकडून सोशल मीडियासह विविध माध्यमांतून पसरवल्या जात आहेत. या अफवांना कोणतेही तथ्य नसून, महामंडळाचे नवीन पात्रता प्रमाणपत्र देण्याचे काम वगळता इतर सर्व कामकाज सुरळीतपणे सुरु आहेत. या अनुषंगाने खालील बाबी सर्वसामान्यांना कळविण्यात येत आहेत.

दि. १० ऑक्टोबर २०२५ पासून महामंडळाच्या वेब प्रणालीचे Upgradation चे काम हाती घेण्यात आले असून, त्यामागील प्रमुख कारणे खालीलप्रमाणे:

१. वेब प्रणालीचे Security Audit प्रलंबित होते ते पूर्ण करणे अत्यावश्यक आहे.

२. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अंतर्गत, महामंडळाने स्वत: हून LOI व Bank Sanction या दोन सेवा अधिसुचित केल्या आहेत. या नुसार या सेवा १५ कार्यालयीन कामकाजाच्या दिवसांत देण्याचे बंधन महामंडळाने स्वत: वर घालून घेतले आहे. याबाबत आवश्यक ते बदल वेब प्रणालीमध्ये करणे सुरु आहे.

३. एजंटमार्फत लाभार्थ्यांची होणारी आर्थिक पिळवणूक थांबावी यासाठी म्हणून महामंडळाने CSC केंद्रांद्वारे फक्त ७० रुपयांत सेवा उपलब्ध व्हाव्यात यासाठी चजण केला आहे. त्यास अनुषंगाने वेबप्रणालीमध्ये आवश्यक ते बदल करण्याचे काम सुरु आहे.

४. लाभार्थ्यांना महामंडळाच्या सर्व सेवा थेट मोबाईलद्वारे देता याव्यात म्हणून Mobile App विकसित होत आहे. यासाठी वेबप्रणालीमध्ये आवश्यक ते बदल करणे सुरु आहे.

५. राज्यात विविध ठिकाणी एजंटमार्फत लाभार्थ्यांची आर्थिक फसवणूक होत असल्याचे निदर्शनास आल्याने, सद्यस्थितीत नाशिक व अहमदनगरमध्ये संबंधितांवर फौजदारी गुन्हे नोंद केले गेले आहेत. असे प्रकार घडू नयेत यासाठी वेब प्रणालीमध्ये आवश्यक ते बदल करण्याचे काम सुरु आहे.

६. Nationalized Banks सोबत Bank API Integration सुरु असून, लाभार्थ्यांना सुरळीत व सहजपणे व्याज परतावा मिळणार आहे.

७. Chat GPT Smart Bot प्रणाली विकसित करण्यात आली आहे, जी लाभार्थ्यांना महामंडळाच्या योजनांबाबत मार्गदर्शन व माहिती देईल.

८. योजनांतर्गत काही असे व्यवसाय निदर्शनास आले आहेत की, त्यामधून अपेक्षित स्वयंरोजगारनिर्मिती होत नाही अशा व्यवसायांबाबतचा अंकेक्षणाबाबत योग्य निर्णय संचालक मंडळाच्या बैठकीत घेणे प्रस्तावित आहे. तसेच मराठा समाजातील युवकांसाठी नवीन व्यवसाय कसे निर्माण करता येऊ शकतील? ही बाब विचाराधीन आहे.

९. लाभार्थ्यांसाठी Online Webinars च्या माध्यमातून प्रशिक्षण कार्यक्रम देखील सुरु करण्यात आले आहे.

१०. यापूर्वी व्याज परताव्याकामी लाभार्थ्यांना एका वेळेस कमाल ३ क्लेम सादर करता येत होते. मात्र सद्यस्थितीत लाभार्थ्यांना एका वेळेस कमाल ६ क्लेम सादर करता येत आहेत. सर्वांना विनम्र आवाहन आहे की, महामंडळ समाजाच्या उत्थानासाठी व शाश्र्वत आर्थिक विकासासाठी कटिबद्ध आहे. तरी कोणत्याही प्रकारच्या राजकीय, दिशाभूल करणाऱ्या किंवा अफवांवर आधारीत माहितीवर विश्र्वास ठेवू नये. महामंडळाचे सर्व कामकाज सुरु असून, वेब प्रणालीचे अद्ययावतीकरण हे समाजहिताचे व लाभार्थ्यांच्या सोयीसाठीचे आहे.

**महामंडळाच्या कामकाजाबाबत वस्तुस्थिती**

| तपशील | जुलै-2025 | ऑगस्ट-2025 | सप्टेंबर-2025 | ऑक्टोबर-2025 | 6 नोव्हेंबर, 2025 पर्यंत | जुलै-2025 पासून आजपर्यंत |
|---|---|---|---|---|---|---|
| निर्माण झालेले LOI | 10,811 | 8,817 | 13,733 | 1,422 | - | 34,783 |
| Bank Sanction संख्या | 4,808 | 4,999 | 4,104 | 2,384 | 1,187 | 17,482 |
| व्याज परतावा रक्कम | 36,12,51,327 | 116,59,98,192 | 61,09,92,210 | 50,30,67,782 | 6,16,48,296 | 270,29,57,808 |

# बिहारी वास्तव

बिहारच्या बहुचर्चित विधानसभा निवडणुकीची मतमोजणी उद्या (शुक्रवारी) होईल आणि उद्याच निकालही जगजाहीर होतील. नव्या प्रथेनुसार त्यापूर्वी परवाच विविध माध्यम संस्थांनी आपल्या मतदानोत्तर सर्वेक्षणांचे अंदाज जाहीर केले. सर्वच्या सर्व अंदाज राष्ट्रीय लोकशाही आघाडीला स्पष्ट बहुमत मिळेल, असेच सांगत असून भारतीय जनता पक्ष हा राज्यातील सर्वात मोठा पक्ष असेल, असेही भविष्य त्यांनी वर्तवले आहे. मतदानोत्तर सर्वेक्षणातल्या निष्कर्षांना बऱ्याच मर्यादा असतात. अशा सर्वेक्षणांचे निष्कर्ष कधीतरीच बरोबर ठरले आहेत. बहुतांश वेळा ते चुकीचेच ठरतात. अगदी बिहारमधल्या मागच्या दोन निवडणुकांतले अंदाज असेच चुकीचे ठरले होते. अंदाज चुकण्याचं सर्वात मोठं कारण पूर्ण शास्त्रीय प्रक्रियेचा अभाव, 'सुतावरून स्वर्ग' गाठत निष्कर्ष काढण्याची पद्धत. निवडणुकीचं साधारण वारं पाहून नजरअंदाज पद्धतीने भाकितं वर्तवण्याची सवय; पण ते मांडताना छातीठोक आत्मविश्वासाचं प्रदर्शन! भाकीत वर्तवताना आपलंच भाकीत कसं अचूक असेल हे सांगणारे, त्याचं समर्थन; आणि त्यावर कडी म्हणजे तेच सत्य मानून त्याचं विश्लेषणही करणारे प्रत्यक्ष निकाल लागल्यानंतर कुठे दिसत नाहीत. प्रत्यक्ष निकालाच्या जवळपास अंदाज आला, तर त्याची शेखी मिरवायला हे पुढे असतात; पण अंदाज फसला, तर त्याचं कारण काय, हे सांगायला अजून तरी कधीही कोणी टीव्हीच्या पडद्यावर आलेलं दिसलं नाही. बिहारमध्ये मतदारांनी काँग्रेसला खूपच दुबळं केलं आहे. महायुतीतल्या सगळ्या पक्षांना हे माहीत असूनही मोठ्या घरचं दुखणं असल्याने कोणी बोलू शकत नाही. गेल्या निवडणुकीत काँग्रेसच्या वाईट कामगिरीने विरोधी आघाडीचा घात केला होता. यावेळीही 'महागठबंधन' म्हणून मैदानात उतरलेल्या महाआघाडीला तीच भीती आहे. बिहारचं राजकारण हे करिश्म्यावर चालणारं राजकारण नाही. जात हाच तिथल्या राजकारणाचा पाया आहे. जातीआधारित मतगठ्ठा तयार करणं आणि त्यांचा जास्तीत जास्त विश्वास संपादन करत मतपेटीपर्यंत पोहोचणं हेच बिहारच्या राजकारणाचं इंगित आहे. काँग्रेसला ते माहीत असायलाच हवं. बिहारचं हे घट्ट जातवास्तव नवी पिढी बदलेल, असं दर पाच वर्षांनी होणाऱ्या निवडणुकीत म्हटलं जातं. पण, दर निकालानंतर नव्या मतदारांनीही आपल्या राज्याचा जुनाच ट्रेंड कायम ठेवल्याचं दिसतं तेव्हां विश्लेषणाची दिशा बदलते. भारतीय जनता पक्षाने हे पूर्वीच ओळखलं आणि आपली प्रतिमा पूर्णपणे बदलली. दिवंगत कर्पुरी ठाकूर यांच्या दोन शिष्यांपैकी नितीशकुमार यांना लालूप्रसाद यांच्यापासून बाजूला करून त्यांनी त्याची सुरुवात केली. दिवंगत ठाकूर यांनी इतर मागासवर्गीय आणि मागास जातींची बसवलेली भक्कम घडी लक्षात घेऊन त्यांनी ठाकूर यांना मरणोत्तर 'भारतरत्ना'ने गौरवलंच; शिवाय त्यांना 'जननायक' ही उपाधीही बहाल केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिल्लीतील भाषणांतूनही कर्पुरी ठाकूर यांचं सन्मानपूर्वक स्मरण केलं. बिहारमध्ये गेल्यानंतर तर ते ठाकूर यांच्या पुतळ्याला वंदन केल्याशिवाय राहत नाहीत. त्यांचे प्रयत्न प्रामाणिक आहेत, पक्षाला व्यापक जनाधार मिळवून देण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. पक्षाचा मतदार तयार करण्याचा, पक्षाला सामाजिक आधार मिळवून देण्यासाठी भारतीय जनता पक्षाची व्यूहरचना ठरवणाऱ्यांची दिशाही बरोबर आहे; पण तरीही त्यांना अजून 'स्वतःचा चेहरा' मिळेना ही वस्तुस्थिती आहे. अंशतः स्मृतीभंश झालेल्या नितीशकुमार यांचा चेहराच त्यांना आजही पुढे करावा लागतो आहे. भाजप यावेळी तरी आपला चेहरा घेऊन निवडणुकीत उतरेल, असं वाटत होतं. पण तेवढा भरवसा ठेवावा, अशा चेहऱ्याच्या शोधात पक्ष अजूनही आहे, असंच दिसतं. बिहारमधल्या मागास जाती १९७० च्या दशकात राजकीयदृष्ट्या जागृत झाल्या आणि त्यांनी आपली राजकीय फळी बनवली. उत्तर भारतात फक्त बिहारमध्येच ही प्रक्रिया घडली आणि स्थिरावलीही. कर्पुरी ठाकूर यांनी १९७८ मध्ये तिथे इतर मागासवर्गीय जातींना स्वतंत्र आरक्षण दिलं. देशात मंडल आयोगाच्या शिफारशी लागू होण्याआधी सुमारे तेरा वर्षे घडलेल्या या सामाजिक बदलाचा परिणाम तिथल्या राजकारणावर फार खोलवर झाला आहे. या प्रक्रियेतून घडलेल्या प्रादेशिक पक्षांच्या नेतृत्वाखालीच तिथे राष्ट्रीय पक्षांना आपलं राजकारण करावं लागतं आहे. यावेळी भाजपला सर्वाधिक जागा मिळण्याचा अंदाज असल्याने तो पक्ष निकालानंतर काय भूमिका घेतो, याविषयी म्हणूनच सर्वात जास्त उत्सुकता आहे. 'लाडकी बहीण' चा यशस्वी फॉर्म्युला यावेळी बिहारमध्येही वापरला गेला आहे. निवडणुकीआधी सरकारने आयकर न भरणाऱ्या सर्व महिलांच्या बँक खात्यात दहा हजार रुपये एकरकमी पाठवून दिले आहेत. महिलांना उद्योजक बनवण्यासाठी हे बीज भांडवल आहे, असं सरकारने म्हटलं आहे. त्यामुळे, अन्य राज्यांप्रमाणे ही मासिक अनुदान योजना नसावी, असं वाटतं. पण, सांगता येत नाही. गरज वाटलीच, तर बिहार सरकार या बीज भांडवलात वेळोवेळी अधिक भर टाकू शकतं!! या दहा हजार रुपयांनी आणि निवडणुकीच्या काळात मिळालेल्या आणखीही 'आश्वासनां'नी यावेळी बिहारच्या निवडणुकीत चांगलेच रंग भरले होते. परिणामी मतदानाचे यापूर्वी न दिसलेले आकडे गाठले गेले. महिलांनी रांगा लावून आवर्जून मतदान केलं. ही सगळी चिन्हं विद्यमान सरकारसाठी अनुकूल असल्याने यावेळी पुन्हा राष्ट्रीय लोकशाही आघाडीलाच बहुमत मिळेल, असं म्हटलं जातं आहे. खेड्यापाड्यात महिलांमध्ये 'मोदीजीने भेजे हुए पैसे' अशी भावना पसरल्याने भाजपला त्याचा जोरदार फायदा होईल. पक्ष पहिल्या क्रमांकावर असेल, असं मानलं जातं आहे. मतदानोत्तर सर्वेक्षणाचा दावा करणाऱ्यांनी या 'हवे' चीच री ओढली आहे. निवडणुकीआधी राष्ट्रीय जनता दलाच्या तेजस्वी यादव यांच्याविषयी बरंच बोललं जात होतं. पण, पंतप्रधान मोदी आणि गृहमंत्री अमित शहा या दोघांनीही प्रचारादरम्यान त्यांच्यावर असा काही हल्ला चढवला, की ते मागे पडले. तेजस्वी नव्या पिढीच प्रतिनिधित्व करत असले, आधुनिक भाषा बोलत असले तरी ते लालूप्रसाद यांचे चिरंजीव आहेत, ही बाब कधीच पुसली जाणार नाही. बिहारमधल्या उच्च जाती त्यामुळे त्यांना आधार द्यायला सहजासहजी तयार होणार नाहीत. लालूप्रसाद-राबडीदेवींवर असलेल्या भ्रष्टाचाराच्या आरोपांचं ओझं आपोआपच त्यांच्या पाठीवर येऊन पडतं. महाआघाडीने त्यांनाच मुख्यमंत्री पदाचा चेहरा म्हणून निवडणुकीत पुढे केलं आहे. जेव्हां निकाल येतील आणि 'महाआघाडी'ला फटका बसेल, तेव्हा त्याचा सर्वात मोठा धक्का तेजस्वी यांनाच बसेल. 'महाआघाडी' राखणंही कठीण होऊन जाईल. बिहारच्या निकालाने देशातल्या भाजपानुकूल वातावरणाला आणखी बळ मिळेल!





## वजन कमी आणि सौंदर्यासाठी

# आवळ्याचा जादुई फॉर्म्युला

मुंबई : शरीर निरोगी ठेवण्यासाठी योग्य आणि संतुलित पोषण मिळणे अत्यंत आवश्यक असते. व्हिटॅमिन सी आणि अँटीऑक्सिडंट्सने परिपूर्ण असलेला आवळा हा आरोग्यासाठी अतिशय उपयुक्त मानला जातो. केस, त्वचा आणि पचनाशी संबंधित अनेक समस्या दूर करण्यासाठी आवळ्याचा वापर फायदेशीर ठरतो. आहारात आवळ्याचा समावेश अनेक प्रकारे करता येतो - काहीजण तो भाजी स्वरूपात खातात, तर काहींना कच्चा आवळा खाणे आवडते. रस तयार करण्यासाठी लागणारे साहित्य - आवळा, कच्ची हळद, आले, कढीपत्ता आणि काळी मिरी.



हा रस तयार करण्याची पद्धत अगदी सोपी आहे. एका आवळ्यासोबत कच्च्या हळदीचा एक छोटा तुकडा, आल्याचा तुकडा आणि चिमूटभर काळी मिरी घ्या. हे सर्व घटक मिक्सरमध्ये एकत्र वाटून रस तयार करा. सकाळी रिकाम्या पोटी हा रस प्यायल्याने शरीराला अनेक फायदे होतात. दररोज या रसाचे सेवन केल्याने त्वचेला नैसर्गिक तेज येते, केस मजबूत व मऊ राहतात आणि वजन कमी होण्यासही मदत होते. जर तुम्हाला केसगळती कमी करायची असेल आणि चेहऱ्यावर नैसर्गिक चमक आणायची असेल, तर या पेयाला तुमच्या दिनक्रमाचा भाग जरूर बनवा. वजन कमी करण्याच्या प्रक्रियेत आवळ्याची भूमिका महत्त्वाची आहे. तो शरीरातील चयापचय वाढवतो आणि चरबी जळण्याची गती सुधारतो. याशिवाय भूक आणि अनावश्यक खाण्याची इच्छा नियंत्रित ठेवण्यासही तो मदत करतो. त्यामुळे निरोगी केस, त्वचा आणि सडपातळ शरीर हवे असल्यास आवळ्याचा आहारात नियमित समावेश करा.

# दररोजच्या जीवनातील ताण आणि चिंता कमी करण्यासाठी ही आसने करतील आपणास मदत

मुंबई : दररोज योगाभ्यास करुन ताण-तणावाचे व्यवस्थित व्यवस्थापन करणे शक्य आहे. यामुळेच आजच्या धकाधकीच्या जीवनात योगाभ्यासाचे महत्त्व आणखी वाढले आहे. हा योगाभ्यास करण्यासाठी क्लासला जाणे शक्य नसेल तर काळजी करू नका. आता तुम्ही घरच्या घरीच काही आसनं करून तणावमुक्त राहू शकता. ते कसं ? चला बघुया... दररोज काही तास या आसनांसाठी दिल्यास शरीरावरील ताण कमी होतो आणि मन प्रसन्न राहते. चिंता, अस्वस्थता आणि मानसिक थकवा कमी करून दिवस अधिक सकारात्मक करू शकता.





कॅट काऊ पोज : मणक्याचा तणाव कमी करण्यासाठी उत्तम उपाय, या आसनात पाठीचा कणा वर खाली हलवून शरीरातील ताण कमी होतो. श्वसनावर योग्य प्रकारे नियंत्रण ठेवले आणि लयीत हालचाल केली तर रक्ताभिसरण सुधारते आणि मज्जासंस्थेला आवश्यक आराम मिळतो शिवाय लवचिकता वाढते.

बालासन : मनाला विश्रांती देणारे असं आसन. गुडघ्यांवर बसून हात पुढे ठेवावेत. हे असं शरीर आणि मन असा दोन्हींना शांती देते. पाठीचा ताण कमी होतो. खांदे सैलावतात आणि मनावरील ताण दूर होतो.

शवासन : संपूर्ण शरीराच्या विश्रांतीसाठी सर्वोत्तम आसन. पाठीवर झोपून शरीर शिथिल करा आणि श्वासावर लक्ष केंद्रत करा. हे आसन मन शांत ठेवण्यासाठी आणि स्थिरतेसाठी अतिशय प्रभावी आहे.

लेग्ज-अप-द-वॉल पोझ : एनर्जी साठवण्यास मदत करणारे आसन, पाठीवर झोपून पाय भिंतीवर टेकवण्याने शरीरातील रक्तप्रवाह सुधारतो, हे आसन शारीरिक आणि मानसिक थकवा कमी करण्यासाठी मदत करतं .

पश्चिमोत्तानासन : हे आसन केल्याने पाठीचा कणा आणि हॅमस्ट्रिंग्स ताणते, यामुळे मानसिक शांतता मिळते. पचनशक्ती सुधारते.

वृक्षासन : हे आसन आंतरिक शांती आणि शांतता प्रदान करत, या आसनामुळे एकाग्रता वाढते आणि मानसिक संतुलन सुधारते. हे आसन स्नायूंना मजबूत करते, ज्यामुळे तणाव कमी होतो आणि मानसिक स्थैर्य मिळते.

## डॉक्टर टीप्स

### रात्री उशिरा झोपणार्या पुरुषांना नपुंसक होण्याचा धोका

म्हणून कुटुंब वाढवण्याची योजना आखत असणाऱ्या पुरुषांसाठी लवकर झोपणे आणि लवकर उठणे, गोल्डन रूल सिद्ध होऊ शकतो. कारण रात्री उशीरापर्यंत जागत राहण्याने नपुंसकत्वाचा धोका वाढतो, अलीकडेच झालेल्या एका शोधात स्पष्ट झाले आहे.



या अध्ययनानुसार लवकर झोपणारे पुरुष म्हणजे सुमारे १०.३० वाजेपर्यंत झोपणार्या पुरुषांमध्ये उत्तम गुणवत्ता असलेले शुक्राणू होण्याची शक्यता अधिक असते. इतर पुरुषांच्या तुलनेत जे ११.३० वाजता झोपतात, त्यांच्या शुक्राणू म्हणजे स्पर्मची गुणवत्ता बिघडते. तसेच मागील अनेक शोध झाले आहेत ज्या झोप पुरुष आणि महिलांच्या प्रजनन क्षमतेवर प्रभाव टाकते हे स्पष्ट झालेले आहे. परंतू याचा पुरावा नाही. परंतू मेंदूचा काही भाग स्लीप हार्मोन आणि शुक्राणू प्रक्रियेचं उत्पादन दोन्हीला प्रभावित करतं.

अध्ययनाप्रमाणे अनिद्रा शुक्राणू पतनाचे **(क्रमशः)**

## विनोद




तीन वृद्ध मेमरी टेस्टसाठी डॉक्टरांकडे आले. डॉक्टरांनी त्यांना प्रश्न केला, 'तीन त्रिक किती?'

**पहिला वृद्ध :** २७४, दुसरा वृद्ध : गुरूवार, तिसरा वृद्ध : नऊ.

तिसऱ्या वृद्धाचे उत्तर ऐकून डॉक्टरांना खूप समाधान वाटले. त्यांनी त्यांना विचारले, 'तुम्ही एकदम बरोबर उत्तर कसे दिले?'

तिसरा वृद्ध म्हणाला सोपं आहे. २७४ वजा गुरूवार बरोबर नऊ येतात.

## संदेश

Sonu-Yaar,English Me 'Jhopdi'
Ko Kya Kehte He
Monu-Hutt
Sonu-Abe,English Aati Nhi
To Saaf Saaf Bol Na..hutt hutt
kaya bol rahe ho.

## सुविचार


संस्कारामुळे माणसाला खरे माणूसपण येते.

### संस्कृत सुभाषित

**मन:शुद्ध्यैव शुद्धिः स्याद् देहिनां नात्र**
**संशय:।वृथा तद्व्यतिरेकेण कायस्यैव कदर्थनम्।।**

**अर्थ :** मनाची शुद्धी हीच माणसाची खरीखुरी शुद्धी असते, यात काही शंका नाही. मन शुद्ध नसेल तर बाह्य शरीराच्या शुद्धीचा प्रयत्न म्हणजे शरीर व्यर्थ राबविणेच होय.

# मनोरंजक महाशब्दकोडे



## आडवे शब्द

१. आपले राष्ट्रगीत
६. व्याकूळ
८. राजाचा कालावधी, कारकीर्द
१०. कपोल
११. सूट
१३. निराश, उदास
१४. अवघा, सगळा
१६. तारकांचा स्वामी, चंद्र
१८. मार्गक्रमण
२०. गुणाकारच्या विरुद्ध
२२. छडीचा पातळ बांबू
२३. मौल्यवान अथवा अल्पमोली रत्न
२४. मुंगी झाल्यास हिची गोडी चाखता येणार!
२६. वाकडा नसलेला
२८. होकारच्या विरुद्ध
३०. आंबट पानांची भाजी
३१. संगीतातील पहाटे म्हणण्याचा एक राग
३३. सैन्याची तुकडी
३४. नट्टपट्टा
३६. देऊळ
३८. कोवळा अंकुर
४०. अक्कलशून्य
४१. सत्ता भोगणारा
४३. पूज्य पण गणितातील नव्हे!
४५. भरभराट
४८. शर्त, अट
४९. जन्मदाता, निर्माता
५१. मरूभूमी
५२. बगळा
५३. भांडण, वैर
५५. महान
५७. ढगफुटीमुळे उद्ध्वस्त झालेला प्रदेश
५८. गाणारा
५९. गजाननमहाराजांच्या समाधीचे गाव
६१. प्रतिस्पर्धी
६२. किंमत
६३. एकटा
६५. सुबक अक्षर
६७. चटकन
६९. कावकाव करणारा
७०. नवरदेव
७१. पुण्याचा रहिवासी
७२. लख्ख गोरा
७४. ताठा, नखरा
७५. बाळभाषेत पाणी
७६. पुष्कळ
७७. पुण्याचे
७९. फिकीर, काळजी
८१. बहुतेक, नजीकचे
८३. तलवारीबरोबरचे अस्त्र
८४. सारखेपणा, साम्य
८५. अरण्य
८६. गमन करणे

## उभे शब्द

१. एक मोठे चर्मवाद्य
३. विटीदांडूच्या खेळातील खड्डा
४. चामखीळ
५. नूतन
६. संध्याकाळ
७. डोक्यावर मायेचे छत्र असलेला
८. राजमहाल
९. वयानुसार वाढणारा डोक्यावरील अर्धचंद्र
१२. वेल
१४. वर्षानुवर्षे
१५. धोतराचा पायघोळ भाग
१७. विडा रंगवणारा
१९. भुगा
२०. आपला देश
२१. आवड, रुची
२३. गाढव (संस्कृत)
२५. दाणे वगैरे कुटण्याचे जोडसाधन
२७. आयुर्वेदीय भाषेत 'टॉनिक'
२८. नाकावरील मोत्याचा दागिना
२९. उंच उडीसाठी एकावर एक चढवले जाणारे अडथळे
३२. मत्सर
३३. पळून जाणे
३५. पाषाण
३६. राष्ट्र
३७. तांडा घेऊन भटकणारी व्यापारी जमात
३९. खोडण्याचे, बांधण्याचे चिवट साधन
४१. अखेरीस
४२. धैर्य
४४. झोप, निद्रा
४६. तोफगाडी, चिलखती वाहन
४७. पूजेचे ताट
४८. परभारे
५०. पार्थिव
५४. आकाशात ढगांची गर्दी असे वातावरण
५६. बाहेर काढणे
६०. निरर्थक भटकंती
६२. झुणक्याबरोबर गोड लागणारी
६३. आश्रय, आधार (हिंदी)
६४. केलेल्या कार्यावर पाणी ओतणे
६६. दरवाजा
६८. घुबड
६९. कर्ण
७१. प्राचीन, जुने
७२. गाई सांभाळणारा श्रीकृष्ण
७३. पदर
७५. पवित्र
७७. महाराष्ट्राचे लाडके व्यक्तीमत्त्व
७८. अस्वल
८०. आई
८१. थोडे वृद्धत्व?
८२. सततचे नामस्मरण

## आडवे उत्तरे

१.जनगणमन ६.कासावीस ८.राजवट १०.गाल ११.सवलत १३.नाराज १४.सारा १६.तारकानाथ १८.वाटचाल २०.भागाकार २२.वेत २३.खडा २४.साखर २६.सरळ २८.नकार ३०.चुका ३१.ललत ३३.पथक ३४.नखरा ३६.देवालय ३८.डीर ४०.ढ ४१.सत्ताधीश ४३.माननीय ४५.बरकत ४८.पर ४९.जनक ५१.रण ५२.बक ५३.तेढ ५५.थोर ५७.लेह ५८.गायक ५९.शेगाव ६१.स्पर्धक ६२.भाव ६३.सडा ६५.वळणदार ६७.लवकर ६९.कावळा ७०.वर ७१.पुणेकर ७२.गोरापान ७४.तोरा ७५.पापा ७६.फार ७७.पुणेरी ७९.तमा ८१.जवळजवळ ८३.ढोल ८४.समानता ८५.रान ८६.जाणे

## उभे उत्तरे

१.नगारा ३.गल ४.मस ५.नव ६.कातरवेळ ७.सनाथ ८.राजवाडा ९.टक्कल १२.लता १४.सालोसाल १५.सोगा १७.कात १९.चाराचुरा २०.भारत २१.रस २३.खर २५.खलबत्ता २७.रसायन २८.नथ २९.काकडी ३२.हेवा ३३.पलायन ३५.खडक ३६.देश ३७.लमाण ३९.रबर ४१.सरतेशेवटी ४२.धीर ४४.नीज ४६.रणगाडा ४७.तबक ४८.परस्पर ५०.कलेवर ५४.ढगाळ ५६.हाकलणे ६०.वणवणणे ६२.भाकर ६३.सहारा ६४.बोळा फिरवणे ६६.दार ६८.वकटे ६९.कान ७१.पुरातन ७२.गोपाळ ७३.पालव ७५.पावन ७७.फुल ७८.रीस ८०.माता ८१.जरा ८२.जप



# क्रीडा विश्व

## थोडक्यात/ संक्षिप्त

### मुंबई इंडियन्स सोडणार अर्जुन तेंडुलकरची साथ! आयपीएल २०२६ ऑक्शनपूर्वी 'या' संघात ट्रेड होणार

मुंबई-जगप्रसिद्ध इंडियन प्रीमियर लीग या स्पर्धेच्या १९ व्या सीजनबाबत फॅन्समध्ये मोठी उत्सुकतता आहे. १५ नोव्हेंबरपर्यंत आयपीएलच्या सर्व फ्रेंचायझींना त्यांच्या संघातील रिटेन आणि रिलीज खेळाडूंची यादी जाहीर करायची आहे. त्यानंतर डिसेंबर महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यात आयपीएल २०२६ साठी मिनी ऑक्शन होण्याची शक्यता आहे. असे असतानाच आता मुंबई इंडियन्सच्या गोटातून एक मोठी बातमी समोर येतेय. मुंबई इंडियन्स ही आयपीएल २०२६ ऑक्शनपूर्वी अर्जुन तेंडुलकरची साथ सोडण्याची शक्यता आहे.

कोणत्या खेळाडूसोबत होणार ट्रेड?

अर्जुन तेंडुलकर हा दिग्गज क्रिकेटर सचिन तेंडुलकरचा धाकटा मुलगा आहे. आयपीएल २०२५ च्या मेगा ऑक्शनमध्ये मुंबई इंडियन्सने बेस प्राईजवर अर्जुन तेंडुलकरची निवड केली होती. मात्र गेल्या सीजनमध्ये त्याला एकही सामना खेळण्याची संधी मिळाली नाही. क्रिकेबजच्या एका रिपोर्टनुसार अर्जुन तेंडुलकरला मुंबई इंडियन्स ट्रेड करण्याची शक्यता आहे. अर्जुन आणि शार्दूल ठाकूरबाबत मुंबई इंडियन्स आणि लखनऊ सुपर जाएंट्सम ध्ये बातचीत सुरु आहे. रिपोर्टमध्ये सूत्रांच्या हवाल्याने सांगण्यात आले की दोघांची अदलाबदल होऊ शकते, दरम्यान हा पूर्णपणे कॅश ट्रान्सफर होऊ शकतो.

***

### फानयल पराभवानंतर हॉर्ट ब्रेक, तरी खचली नाही, दोनच आठवड्यात 'स्मृती'चा मुकूट हिसकावला

दिल्ली-टीम इंडियाच्या महिला संघाने दोन आठवड्यापूर्वी वूमेन्स वर्ल्ड कप जिंकला होता. या विजयानंतर भारतात मोठा जल्लोष करण्यात आला. तर साऊथ आफ्रिकेच्या पराभवानंतर कर्णधार लॉरा वोल्वार्डला मोठा धक्का बसला होता. कारण शतकीय खेळी करून देखील ती संघाला जिंकवून देऊ शकली नव्हती.त्यामुळे तिचा मोठा हॉर्ट ब्रेक झाला होता, पण ती खचली नाही. आणि तिने दोनच आठवड्यात स्मृतीचा मुकूट हिसकावला आहे.

आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने आज ऑक्टोबर महिन्याच्या प्लेअर ऑफ द मंथ खेळाडूची घोषणा केली आहे. यामध्ये वुमेन्स वर्ल्ड कप स्पर्धेतील उपविजेत्या दक्षिण आफ्रिका संघाची कर्णधार लॉरा वोल्वार्ड हिला प्लेअर ऑफ द मंथ म्हणून निवडण्यात आले आहे. त्यामुळे तिने भारताची उपकर्णधार स्मृती मानधना आणि ऑस्ट्रेलियाची दिग्गज खेळाडू ॲश गार्डनर यांना मागे टाकले.अशाप्रकारे तिने वर्ल्ड कप पराभवाच्या दोनच आठवड्यात बाजी मारन स्मृती मानधनाच्या हातून नंबर वनचा मुकूट हिसकावला आहे.लॉरा वोल्वार्ड हिने महिला विश्वचषकात आठ साम न्यांमध्ये ६७.१४च्या सरासरीने आणि ९७.९१ च्या स्ट्राईक रेटने ४७० धावा केल्या आहेत.

***

### मिका सिंग आणि हुमा कुरेशी यांनी दिल्लीतील बॉम्बस्फोटमुळे केले कार्यक्रम रद्द

मुंबई,-दिल्लीच्या लाल किल्ला मेट्रो स्टेशनबाहेर झालेल्या एका दु:खद कार स्फोटात अनेक लोक ठार झाले आणि अनेकजण जखमी झाले आहेत. ही घटना १० नोव्हेंबर रोजी घडली. या दहशतवादी हल्ल्यानं संपूर्ण देशाला धक्का बसला आहे, ज्यामध्ये सेलिब्रिटींचाही समावेश आहे. सर्वजण पीडितांच्या कुटुंबियांबद्दल शोक व्यक्त करत आहेत. दिल्लीच्या सोहो क्लबमध्ये सादरीकरण करण्यासाठी नियोजित कार्यक्रमाला गायक मिका सिंगनं स्फोटानंतर रद्द केला. हुमा कुरेशी आणि 'कॉकटेल २'च्या टीमनेही त्यांचे संबंधित कार्यक्रम रद्द केले आहेत. १२ नोव्हेंबर रोजी, बॉलिवूड अभिनेत्री आलिया भट्टनं दिल्ली कार बॉम्बस्फोटांवर प्रतिक्रिया दिली. तिन तिच्या इंस्टाग्राम स्टोरीवर एक पोस्ट शेअर केली, ज्यामध्ये लिहिले होते, 'पीडितांच्या कुटुंबियांना किती नुकसान झाले असेल याची मी कल्पनाही करू शकत नाही. देव आपल्याला या अराजकतेतून लवकर बाहेर काढो. मी या दुर्घटनेनं प्रभावित झालेल्या प्रत्येकांच्या आत्म्यासाठी प्रार्थना करते.'दिल्लीतील बॉम्बस्फोटवर मिका सिंग : दिल्लीच्या लाल किल्ला मेट्रो स्टेशनबाहेर झालेल्या दु:खद बॉम्बस्फोटानंतर, मिका सिंगनं दिल्लीच्या सोहो क्लबमधील त्याचा शो रद्द केल्याची बातमी सोशल मीडियावर शेअर केली आहे. आता, मिका सिंगनं स्वत: सोशल मीडियावर या बातमीला दुजोरा दिला आहे.

***

### भारत-दक्षिण आफ्रिका कसोटी सामन्याची वेळ बदलली! किती वाजता सुरू होणार?

मुंबई -दक्षिण आफ्रिकेचा संघ सध्या भारत दौऱ्यावर असून दोन्ही संघांमध्ये तिन्ही फॉरमॅटमध्ये मालिका खेळवल्या जातील. येत्या १४ नोव्हेंबरपासून भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील कसोटी मालिकेला सुरूवात होणार आहे. तर दुसरा सामना २२ नोव्हेंबरपासून दुसरा कसोटी सामना गुवाहाटीत खेळवला जाईल. कसोटी मालिकेतील हे दोन्ही सामने किती वाजता खेळवले जाणार आणि सामन्याच्या वेळेत झालेला बदल नेमका काय आहे, पाहूया.भारत आणि दक्षिण आफ्रिका कसोटी मालिकेतील दुसऱ्या सामन्यापूर्वी वेळेत बदल झाल्याची माहिती समोर येत आहे. शिवाय, काही दिवसांपूर्वी, या सामन्यातील लंचब्रेक आणि टी-ब्रेकमध्ये बदल होणार असल्याचेही वृत्त समोर आले होते. यामुळे परंपरागत चालत आलेल्या कसोटी क्रिकेटमध्ये मोठा बदल पहिल्यांदाच पाहायला मिळू शकतो.भारतात कसोटी सामने सामान्यत: सकाळी ९:३० वाजता सुरू होतात. सामन्याच्या पहिल्या दिवशी सकाळी ९ वाजता नाणेफेक होते. पण गुवाहाटीमधील साम न्याच्या वेळेत बदल होणार आहे. सध्या या बदलाची माहिती समोर येत आहे.

## जपान मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेत लक्ष्य, प्रणॉयची विजयी सलामी



**नवी दिल्ली:**भारताच्या लक्ष्य सेन आणि एच. एस. प्रणॉय यांनी जपान मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेत बुधवारी विजयी सलामी दिली. सातव्या म ानांकित लक्ष्य सेन याने ३९ मिनिटांत जपानच्या कोकी वाताना याचा २१-१२, २१-१६ असा पराभव केला. प्रणॉयने संघर्षपूर्ण लढतीत पहिल्या फेरीचा अडथळा पार केला. त्याने मलेशियाच्या लेऑन्ग जुन हाओ याचे आव्हान १ तास ८ मिनिटांच्या लढतीत १६-२१, २१-१३, २३-२१ असे परतवून लावले.

सुरुवातीच्या बरोबरीनंतर पहिल्या गेम च्या मध्याला लेऑन्गने ११-९ अशी आघाडी मिळवली होती. त्यानंतरही दोघांमध्ये गुणांसाठी झालेल्या चुरशीम ुळे गेम बरोबरीत सुरू होता. मात्र, १३-१३ अशा बरोबरीला लेऑन्गने सलग पाच गुणांची कमाई करत १८-१३ अशी आघाडी घेतली आणि ती कायम राखत पहिला गेम जिंकला. दुसऱ्या गेममध्ये प्रणॉय सातत्याने आघाडीवर होता. मात्र, हा फारक एक-दोन गुणांचाच होता. प्रणॉयने ८-८ अशा बरोबरीला सलग सहा गुणांची कमाई करत १६-८ अशी मिळवलेली आघाडी दुसरा गेम जिंकताना निर्णायक ठरवली. तिसऱ्या गेमला लेऑन्गने ५-० अशी दमदार सुरुवात केली होती. मात्र, त्यानंतर प्रतिआक्रमण करताना प्रणॉयने ६-२ अशा स्थितीत सलग पाच गुण मिळवत ६-७ अशी आघाडी मिळवली. त्यानंतर मात्र गेम सातत्याने बरोबरीतच सुरू राहिला. लेऑन्गने १९-१९ अशा बरोबरीनंतर २०-१९ आणि २१-२० असे दोन 'गेम पॉइंट' मिळवले. मात्र, त्याचा फायदा त्याला घेता आला नाही. प्रणॉयने नंतर सलग तीन गुणांची कमाई करताना गेमसह विजयावर शिक्कामोर्तब केले.

अन्य लढतीत भारतीय खेळाडू अपयशी ठरले. आयुष शेट्टीला जपानच्या कोडाई नाराओकाकडून १६-२१, ११-२१, तरुण मानेपल्ली याला कोरियाच्या जेऑन ह्येओक जीनकडून ९-२१, १९-२१, किरण जॉर्जला मलेशियाच्या कॉक जिंग होंगकडून २०-२२, १०-२१ असा पराभव पत्करावा लागला. मिश्र दुहेरीत रोहन कपूर आणि ऋत्विका शिवानी गड्डे या भारतीय जोडीला अमेरिकेच्या प्रेस्ली स्मिथ आणि जोनी गई जोडीकडून २१-१२, १९-२१, २२-२० अशी हार पत्करावी लागली.

## पुढेही सर्वोत्तम कामगिरी करणार:गंभीर

मुंबई : भारतीय संघाने ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या मैदानातील टी-२० मालिका जिंकली. या निकालामुळे आगामी टी-२० विश्वचषक स्पर्धे साठी भारतीय संघ तयार आहे, असे चित्र चर्चा रंगू लागली. पण संघाचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांना मात्र तसे वाटत नाही. बीसीसीआयने नुकताच एक व्हिडिओ शेअर केला आहे. यात गौतम गंभीर यांनी घरच्या मैदानात रंगणार्या टी-२० वर्ल्ड कप स्पर्धेची तयारी अजून बाकी आहे, अशी कबुली देत त्यांनी संघाकडून असलेल्या अपेक्षांवरही भाष्य केले.

आगामी टी-२० विश्वचषक स्पर्धे च्या तयारी संदर्भात भारतीय संघाचा दृष्टिकोन स्पष्ट करताना गौतम गंभीर म्हणाले की, आगामी टी-२० विश्वचषक स्पर्धेसाठी आम्ही जबाबदारी, प्रामाणिकपणा आणि परिणामकेंद्री दृष्टिकोन या तत्त्वांवर भर देत देत आहोत. बहाणे नकोत लवचिक राहून प्रत्येक सामन्यातून काहीतरी शिकण्याची गरज आहे.

## एकदिवसीय फलंदाजांच्या क्रमवारीत शर्मा पहिल्या स्थानावर, विराट कोहलीने बाबरला टाकले मागे



दुबई : आयसीसी एकदिवसीय फलंदाजांच्या क्रमवारीत विराट कोहलीने पाकिस्तानच्या बाबर आझमला मागे टाकले आहे. विराट ७२५ रँकिंग गुणांसह पाचव्या स्थानावर पोहोचला आहे. तर बाबर आझम दोन स्थानांनी घसरून ७ व्या स्थानावर पोहोचला. रोहित शर्मा (७८१ गुण) पहिल्या स्थानावर कायम आहे, तर कर्णधार शुभमन गिल (७४५ गुण) चौथ्या स्थानावर आहे. शिवाय, तिलक वर्मा टी२० फलंदाजांच्या क्रमवारीत दोन स्थानांनी घसरून ७६१ गुणांसह पाचव्या स्थानावर पोहोचला आहे. श्रीलंकेचा पथुम निस्सांका (७७९ गुण) तिसऱ्या स्थानावर आहे आणि जोस बटलर (७७० गुण) चौथ्या स्थानावर आहे.पाकिस्तानचा सलमान आगा आणि फिरकी गोलंदाज अबरार अहमद यांनी एकदिवसीय क्रिकेटमध्ये कारकिर्दीतील सर्वोत्तम क्रमवारी गाठली आहे. दक्षिण आफ्रिका आणि श्रीलंकेविरुद्धच्या एकदिवसीय सामन्यांमध्ये त्यांच्या प्रभावी कामगिरीचा फायदा दोघांनाही झाला आहे.

सलमानने रावळपिंडीमध्ये श्रीलंकेविरुद्धच्या पहिल्या एकदिवसीय सामन्यात ८७ चेंडूत नाबाद १०५ धावा केल्या होत्या. त्याने दक्षिण आफ्रिकेविरुद्ध ६९ धावा केल्या होत्या. तो फलंदाजांच्या यादीत १४ स्थानांनी पुढे सरकला आहे आणि तो १६ व्या स्थानावर पोहोचला आहे.

टी-२० फलंदाजांच्या क्रमवारीत शुभमन गिल ८ स्थानांनी पुढे सरकला आहे आणि २२ व्या स्थानावर पोहोचला आहे. गिलने ऑस्ट्रेलियाविरुद्ध ४६ आणि २९ धावा केल्या होत्या. न्यूझीलंडचा टिम रॉबिन्सन १८ स्थानांनी पुढे सरकला आहे आणि २३ व्या स्थानावर पोहोचला आहे. वेस्ट इंडिजचा रोवमन पॉवेल ४ स्थानांनी पुढे सरकला आहे आणि ३० व्या स्थानावर पोहोचला आहे. न्यूझीलंडचा जेकब डफी गोलंदाजांच्या क्रमवारीत ६ स्थानांनी पुढे सरकला आहे आणि तिसऱ्या स्थानावर पोहोचला आहे. मिचेल सँटनर ५ स्थानांनी आपल्या क्रमावारती सुधारणा केली आहे आणि २३ व्या स्थानावर पोहोचला आहे. वेस्ट इंडिजचा रोस्टन चेस ३२ व्या स्थानावर आहे.

इंग्लंड संघ कसोटी संघ क्रमवारीत दुसऱ्या क्रमांकावर पोहोचला आहे. बेन स्टोक्सच्या नेतृत्वाखालील इंग्लंड संघाने विश्वविजेत्या दक्षिण आफ्रिकेला मागे टाकले आहे. या यादीत ऑस्ट्रेलियन संघ पहिल्या क्रमांकावर आहे. कांगारू संघाचे १२४ रेटिंग गुण आहेत. ११२ गुणांसह इंग्लंड आणि १११ गुणांसह दक्षिण आफ्रिका अनुक्रमे दुसऱ्या आणि तिसऱ्या स्थानावर आहेत. १०८ गुणांसह भारत चौथ्या स्थानावर आहे.

## एमसीए च्या उपाध्यक्षपदी जितेंद्र आव्हाड, सचिवपदी खानविलकर



नवी मुंबई: मुंबई क्रिकेट संघटनेच्या (एमसीए) बुधवारी झालेल्या त्रैवार्षिक निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) आमदार जितेंद्र आव्हाड यांची उपाध्यक्षपदी निवड झाली. 'एमसीए'च्या उपाध्यक्षपदी जितेंद्र आव्हाड, सचिवपदी खानविलकर; १६ पैकी १२ जागांवर पवार-शेलार गटाची बाजी ( संग्रहित छायाचित्र)/ लोकसत्ता

मुंबई : मुंबई क्रिकेट संघटनेच्या (एमसीए) बुधवारी झालेल्या त्रैवार्षिक निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) आमदार जितेंद्र आव्हाड यांची उपाध्यक्षपदी निवड झाली. सचिवपदी उन्मेष खानविलकर, सहसचिवपदी निलेश भोसले, कोषाध्यक्षपदी अरमान मलिक यांना पसंती मिळाली. एकूण १६ पैकी १२ जागांवर पवार-शेलार गटाच्या उमेदवारांनी बाजी मारली. अध्यक्षपदी अजिंक्य नाईक यांची बिनविरोध निवड झाली.कार्यकारी परिषदेच्या नऊ जागांवर संदीप विचारे (२४७ मते), सुरज समत (२४६), विघ्नेश कदम (२४२), मिलिंद नार्वेकर (२४१), भूषण पाटील (२०८), नदीम मेमन (१९८), विकास रेपाळे (१९५), प्रमोद यादव (१८६), नील सावंत (१७८) यांची निवड झाली.नामांकितांचे म तदान : सुनील गावस्कर, सचिन तेंडुलकर, दिलीप वेंगसरकर, झहीर खान, अजित आगरकर, धवल कुलकर्णी, ॲबी कुरुविला, निलेश कुलकर्णी, चंद्रकांत पंडित, रमेश पवार, प्रवीण आमरे, वसिम जाफर, संजय मांजरेकर, विनायक सामंत या माजी क्रिकेटपटूंनी म तदानाचा अधिकार बजावला.*अध्यक्ष : अजिंक्य नाईक (बिनविरोध) * उपाध्यक्ष : जितेंद्र आव्हाड विजयी वि. नवीन शेट्टी (२०१-१५५)* सचिव : उन्मेष खानविलकर वि. वि. शाहआलम शेख (२२७-१२९) *सहसचिव : निलेश भोसले वि. वि. गौरव पय्याडे (२२८-१२८) *कोषाध्यक्ष : अरमान मलिक वि. वि. सुरेंद्र शेवाळे (२३४-११९) * प्रशासकीय समिती अध्यक्ष : राजदीप कुमार गुप्ता (बिनविरोध) * प्रशासकीय समिती सदस्य : भरत किणी वि. किशोर जैन (१८४-१३२)

माझ्यासाठी सर्वच निवडणुका सारख्याच आहेत. उपाध्यक्षपदी निवडून आल्याचा मला आनंद आहे. यापुढेही क्रिकेटच्या भल्यासाठीच माझे प्रयत्न असतील. - जितेंद्र आव्हाड, उपाध्यक्ष, मुंबई क्रिकेट संघटना.यापूर्वी मी कार्यकारी परिषद सदस्य म्हणून काम केले आहे. आता सहसचिवपदी निवड झाल्यानंतरही क्रिकेटप्रती माझे प्रेम जराही कमी होणार आहे. यापुढेही क्रिकेटची अविरत सेवा मी करत राहीन. - निलेश भोसले, सहसचिव, मुंबई क्रिकेट संघटना.

## जवाहरलाल नेहरू क्रिकेट मैदानाच्या जागी स्पोर्ट्स सिटी उभारणार



नवी दिल्ली : राष्ट्रीय राजधानी दिल्लीतील क्रीडा क्षेत्रासाठी एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि मोठा निर्णय घेण्यात आला आहे. सध्याचे जवाहरलाल नेहरू स्टेडियम पाडून, त्याच्या जागी १०२ एकर जागेवर एक अत्याधुनिक 'स्पोर्ट्स सिटी' उभी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. केंद्रीय क्रीडा मंत्रालयाच्या उच्चस्तरीय सूत्रांनी आजतकला ही माहिती दिली आहे.

या भव्य प्रकल्पासाठी क्रीडा मंत्रालयाचे अधिकारी कतार आणि ऑस्ट्रेलिया सारख्या देशांमध्ये यशस्वी ठरलेल्या आधुनिक क्रीडा संकुलांच्या मॉडेलचा सखोल अभ्यास करत आहेत. दिल्लीत आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रीडा पायाभूत सुविधा तयार करणे आणि राजधानीला जागतिक स्तरावरील क्रीडा केंद्र म्हणून स्थापित करणे, हा यामागचा मुख्य उद्देश आहे.

क्रीडा मंत्रालयाच्या अधिकार्यांनी स्पष्ट केले की, सध्या जवाहरलाल नेहरू स्टेडियम ज्या जागेवर आहे, त्या संपूर्ण १०२ एकर जमिनीचा विकास केला जाईल. ही नवीन 'स्पोर्ट्स सिटी' देशातील प्रमुख आणि सर्वात मोठ्या क्रीडा सुविधांपैकी एक असेल. या प्रकल्पामुळे खेळांसाठी समर्पित, एकात्मिक आणि आधुनिक सुविधा असलेले केंद्र दिल्लीत साकार होईल, ज्यामुळे खेळाडूंना सर्वोत्तम प्रशिक्षण आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धांसाठी उत्तम ठिकाण उपलब्ध होईल.

स्पोर्ट्स अथॉरिटी ऑफ इंडियाची मालकी असलेल्या या स्टेडिअमची बांधणी १९८२ ला आशियाई खेळांसाठी करण्यात आली होती.

यानंतर तिथे अनेक स्पर्धा खेळविण्यात आल्या आहेत. २०१० ला राष्ट्रकुल खेळांसाठी या स्टेडिअमची पुर्नबांधणी करण्यात आली आहे. सध्या या स्टेडिअममध्ये ६० हजार प्रेक्षकांसाठी आसन क्षमता आहे.

## बिगरॉक मोटरस्पोर्ट्सच्या मॅट मॉसला

पुणे : इंडियन सुपरक्रॉस रेसिंग लीग सीझन २ ची सुरुवात पुण्यातील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल, बालेवाडी येथे अतिशय थरारक वातावरणात झाली, जिथे होम टीम बीबी रेसिंग ने आज विजेता म्हणून बाजी मारली. जगातील पहिल्या फ्रँचायझी-आधारित सुपरक्रॉस लीगच्या उद्घाटन फेरीत अखंड रोमांच, जबरदस्त गती, आणि थरारक स्पर्धा अनुभवायला मिळाली. हजारो प्रेक्षकांनी खचाखच भरलेल्या स्टेडियममध्ये भारतीय आणि आंतरराष्ट्रीय रायडर्सना प्रकाशझोतात रोमांचक शर्यतीत एकमेकांविरुद्ध झुंजताना पाहिले. सीझनच्या पहिल्या फेरीत बीबी रेसिंग टीमने संघ गुणतालिकेत अव्वल स्थान मिळवून आगामी हंगामासाठी जोरदार सूर लावला. ४५०सीसी आंतरराष्ट्रीय वर्गात बिगरॉक मोटरस्पोर्ट्सच्या मॅट मॉस (ऑस्ट्रेलिया) यांनी कठीण ट्रॅकवर अप्रतिम नियंत्रण दाखवत कावासाकीवर स्वार होऊन विजय मिळवला. २५०सीसी आंतरराष्ट्रीय वर्गात हंटर श्लॉसर (अमेरिका) यांनी होंडावर अप्रतिम गती आणि कौशल्य दाखवत प्रेक्षकांची मनं जिंकली. २५०सीसी इंडिया-एशिया मिक्स वर्गात गुजरात ट्रेलब्लेझर्सच्या बेन हॉलग्रेन (थायलंड) यांनी जोरदार प्रदर्शन करत शर्यतीत पहिला क्रमांक मिळवला. रेस सप्ताहांतात ऑस्ट्रेलिया, फ्रान्स, अमेरिका, दक्षिण आफ्रिका आणि थायलंडसारख्या देशांतील रायडर्ससोबत भारतातील प्रतिभावान रायडर्स रुग्वेद बार्गुजे, इक्षान शानबाग आणि प्रज्वल विश्वनाथ यांनीही सहभाग घेतला.

## मॅंचेस्टर सिटीने लिव्हरपूलवर ३-० असा विजय मिळवला



मॅंचेस्टर : इंग्लिश प्रीमियर लीगमधील एका हाय-व्होल्टेज सामन्यात मॅंचेस्टर सिटीने लिव्हरपूलचा ३-० असा पराभव केला. सिटीने सुरुवातीपासूनच खेळावर नियंत्रण ठेवले आणि संपूर्ण सामन्यात लिव्हरपूलला एकही संधी दिली नाही.सिटीचा हा सलग दुसरा विजय होता, ज्यामुळे त्यांना पॉइंट टेबलमध्ये दुसर्या स्थानावर नेण्यात आले. दरम्यान, गतविजेत्या लिव्हरपूलने या हंगामात आतापर्यंत पाच सामने गमावले आहेत आणि लीग स्टँडिंगमध्ये आठव्या स्थानावर आहे.पहिल्या हाफमध्ये हॉलंडने गोल केला.एतिहाद स्टेडियमवर झालेल्या पहिल्या हाफमध्ये एर्लिंग हालांडला पेनल्टी मिळाली, जी लिव्हरपूलचा गोलकीपर जियोर्गी मामारदश्विलीने वाचवली. तथापि, हालांडने २९व्या मिनिटाला मॅथियस न्युन्सच्या शानदार क्रॉसवर हेडरने गोल करून सिटीला आघाडी मिळवून दिली. हाफ टाईमच्या काही मिनिटे आधी, निको गोंझालेझचा शॉट व्हर्जिल व्हॅन डिज्कला लागला आणि तो पोस्टच्या बाहेर गेला आणि सिटीने २-० अशी आघाडी घेतली. ६३व्या मिनिटाला जेरेमीने गोल केला. दुसर्या हाफमध्ये लिव्हरपूलने पुनरागमन करण्याचा प्रयत्न केला, पण तो अयशस्वी झाला. ६३व्या मिनिटाला जेरेमी डोकूने शानदार गोल करून संघाला ३-० अशी आघाडी मिळवून दिली.

ग्वार्डिओलाचा कारकिर्दीतील १०००वा सामना

मॅंचेस्टर सिटीने मॅनेजर पेप ग्वार्डिओला यांच्या कारकिर्दीतील १०००वा सामना साजरा केला. हा ग्वार्डिओला यांचा १०००वा सामना होता आणि त्यांनी त्यांचा ७१६वा विजय नोंदवला. त्यापैकी ३८८ सामने त्यांनी सिटीसोबत खेळले.

## लातूर जिल्हा माहिती कार्यालयातील रद्दी खरेदीसाठी २१ नोव्हेंबर २०२५ पर्यंत दरपत्रके सादर करण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी** : जिल्हा माहिती कार्यालय, येथील वृत्तपत्रांची व मासिकांची रद्दी विक्री करण्यात येणार आहे. यासाठी नोंदणकृत रद्दी खरेदीदारांनी आपली दरपत्रके २१ नोव्हेंबर २०२५ पर्यंत जिल्हा माहिती कार्यालयात सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

इच्छूक रद्दी खरेदीदारांनी आपले दरपत्रके बंद लिफाफ्यात जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय, मध्येवर्ती प्रशासकीय इमारत, तळमजला, उत्तर बाजू , लातूर या पत्यावर २१ नोव्हेंबर २०२५ सायंकाळी ५ वाजेपर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सादर करावीत. कार्यालयीन वेळेत रद्दी पाहावयास मिळेल.

रद्दी खरेदीदाराकडे इलेक्टॉनिग वजन काटा असणे बंधनकारक आहे. या संदर्भातील अटी व शर्ती कार्यालयीन वेळेत कार्यालयात पाहता येतील. दरपत्रकात वृत्तपत्र रद्दी, मासिके रद्दी व पेपर गोळा याचे स्वतंत्र दर नमूद करावेत, रद्दी विक्रीचे दरपत्र मंजूर करणे अथवा रद्द करणे, तसेच संपुर्ण रद्दी विक्री प्रक्रिया रद्द करण्याचे सर्व अधिकार जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्याल्य,लातूर यांना राहतील, असे लातूर जिल्हा माहिती कार्यालयामार्फत कळविण्यात आले आहे.

## महिला सक्षमीकरणाकडे आणखी एक पाऊल;विलासराव देशमुख फाउंडेशनतर्फे लातूरमध्ये मोफत शिलाई प्रशिक्षण केंद्राचा (क्र. १३) शुभारंभ



**लातूर/प्रतिनिधी** : विलासराव देशमुख फाउंडेशनच्या वतीने लातूर शहरातील महिलांना स्वावलंबी बनविण्यासाठी मोफत व्यावसायिक प्रशिक्षण देण्याच्या उपक्रमांतर्गत, प्रभाग क्रमांक १४ येथील तुळजाभवानी नगर, जुना औसा रोड येथे मोफत शिलाई मशीन प्रशिक्षण केंद्र क्र. १३ चा शुभारंभ करण्यात आला आहे.

राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री तथा महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाने आणि ट्वेंटीवन ॲग्रीच्या संचालिका सौ. अदिती अमित देशमुख यांच्या संकल्पनेतून विलासराव देशमुख फाउंडेशनच्या माध्यमातून महिलांना रोजगाराची संधी मिळावी, यासाठी हे नवीन केंद्र सुरू करण्यात आले आहे. फाउंडेशन कडून महिलांना मोफत प्रशिक्षण देऊन स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचे महत्त्वपूर्ण काम करण्यात येत आहे.

**८४ महिलांचा सहभाग**

या प्रशिक्षण केंद्रामध्ये एकूण ८४ महिलांनी आपला सहभाग नोंदवला आहे. या ठीकाणी महिलांना शिलाईकामातील विविध पद्धती आणि तंत्रांचे सखोल प्रशिक्षण दिले जाणार आहे. या केंद्राचा शुभारंभ विलास को. ऑप.बँक लातूरचे चेअरमन ॲड. किरण जाधव यांच्या शुभहस्ते झाले. यावेळी संस्थेच्या समन्वयक संगीता मोळवणे, अविनाश देशमुख, विक्रम बिराजदार, चंद्रज्योती बिराजदार, उर्मिला मुगळे, ट्रेनर क्रांती उफाडे ठाकूर, जगताप आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सविता कुलकर्णी यांनी केले, तर संगीता कदम, पूजा गोरे, लक्ष्मी काटकर, अलका राजेगावे या महिलांनी आपले मनोगत व्यक्त केले. संस्थेचे सोशल प्लॅनर गजानन बोयणे आणि प्रभागातील मोठ्या संख्येने महिला या उद्घाटन सोहळ्याला उपस्थित होत्या.

## -दिल्लीतील स्फोटानंतर शिर्डीतील सुरक्षा व्यवस्था वाढवली; पोलिसांकडून ठिकठिकाणी नाकाबंदी

शिर्डी : साईबाबांची शिर्डी नेहमीच भाविकांनी गजबजलेली असते. येथे आलेला भाविक साईच्या श्रद्धनं भावनिक झालेला दिसून येतो. दररोज हजारो भक्त साई दर्शनासाठी येतात. राजधानी दिल्लीतील घटनेनंतर शिर्डी पोलिसांनी मंदिर परिसरात सुरक्षा वाढवली आहे.

# ‘एआय’ च्या युगात जबाबदार पत्रकारितेचा नवा दृष्टिकोन घडवा : अपर मुख्य सचिव मनीषा वर्मा

**मुंबई/प्रतिनिधी** : पत्रकारिता आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) यांच्या संगमातून केवळ तांत्रिक कौशल्य नव्हे, तर जबाबदार वृत्तनिर्मितीची नवीन मानसिकता घडविण्याची गरज आहे, असे प्रतिपादन कौशल्य,रोजगार,उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा वर्मा यांनी केले.






रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ, मंत्रालय व विधिमंडळ वार्ताहर संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित वृत्तपत्र तसेच डिजिटल माध्यम पत्रकारांसाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) प्रशिक्षण कार्यक्रमांच्या उद्घाटनप्रसंगी श्रीमती वर्मा बोलत होत्या. या कार्यक्रमात माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह, रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाच्या कुलगुरू प्रा.डॉ.अपूर्वा पालकर, मंत्रालय व विधिमंडळ वार्ताहर संघाचे दिलीप सपाटे तसेच वृत्तपत्रे, डिजिटल मीडिया आणि न्यूज एजन्सीजमधील पत्रकार उपस्थित होते.

अतिरिक्त मुख्य सचिव श्रीमती वर्मा म्हणाल्या की, कृत्रिम बुद्धिमत्ता प्रशिक्षण हे सर्वांसाठी एकसारखे नसावे. प्रत्येकाचा अनुभव आणि तांत्रिक प्रावीण्य ओळखून प्रशिक्षण याची रचना संरचित केले पाहिजे. केवळ साधनांची ओळख न देता, त्यांचा हॅन्ड्स-ऑन वापर शिकविणे ही खरी गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

या प्रशिक्षणामध्ये ‘एआय’ इन न्यूज ब्रॉडकास्टिंग, ‘एआय’ एथिक्स इन रिपोर्टिंग, नॅचरल लँग्वेज प्रोसेसिंग, फॅक्ट चेकिंग, ट्रान्सलेशन टूल्स, चॅट जीपीटी, ग्रामर्ली, गुगल ट्रान्सलेट अशा अनेक प्रायोगिक सत्रांचा समावेश आहे. प्रशिक्षणाच्या प्रत्येक दिवशी शिकण्याचा आलेख चढता राहील आणि शेवटच्या दिवशी सहभागी अधिक आत्मविश्र्वासाने ‘एआय’चा वापर करू शकणार असल्याचे वर्मा यांनी सांगितले.

कृत्रिम बुद्धिमत्तेवरील हे प्रशिक्षण केवळ कोर्स म्हणून नव्हे, तर ज्ञानयुगाच्या नव्या दिशेने उचललेले पाऊल म्हणून घ्या. जगभरातील न्यूयॉर्क टाइम्स, गार्डियन, पीटीआय, हिंदुस्तान टाइम्स यांसारख्या माध्यमांनी एआयचा अंगीकार केला आहे. महाराष्ट्रातील पत्रकारितेलाही हे नवे युग आत्मसात करावे लागेल.

आपले उद्दिष्ट केवळ तांत्रिक प्रगती नसून, एथिकल जर्नालिझमच्या मूल्यांसह तंत्रज्ञानाचा जबाबदार वापर करणे हे असले पाहिजे. लोकशाही संस्थांना बळकट करण्यासाठी माध्यमांची भूमिका अधिक प्रभावी व्हावी, यासाठी ‘एआय’चे ज्ञान अत्यावश्यक असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

**कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे ‘आर्टिफिशियल ब्रेन’ - कुलगुरू प्रा. डॉ. अपूर्वा पालकर**

कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजेच ‘आर्टिफिशियल ब्रेन’. जसे मानवी मेंदूत मेमरी आणि प्रोसेसिंग या दोन प्रक्रिया चालतात, तसेच हे कृत्रिम मेंदूचे काम आहे. पण या आर्टिफिशियल ब्रेनचा उपयोग करताना मानवी बुद्धिमत्तेचा हस्तक्षेप कायम ठेवणे अत्यावश्यक आहे, असे प्रतिपादन रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाच्या कुलगुरू प्रा. डॉ. अपूर्वा पालकर यांनी केले.

कुलगुरू डॉ.पालकर म्हणाल्या की, आजच्या काळात ‘एआय’चा योग्य आणि जबाबदार वापर महत्त्वाचा आहे. चुकीचा वापर केल्यास चुकीची माहिती, फेक न्यूज आणि असत्यता पसरू शकते, हे आपण माध्यमांमध्ये पाहतो आहोत. त्यामुळे ‘एआय’च्या वापराबाबत कायदेशीर आणि नैतिक पैलूंचे ज्ञान असणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.

कुलगुरू डॉ.पालकर म्हणाल्या की, पत्रकारितेच्या दृष्टीने पुढील पाच वर्षांत मोठे बदल घडतील. त्यामुळे सर्व पत्रकारांनी ‘एआय’ शिकणे अत्यावश्यक आहे. ‘एआय’ म्हणजे शेवटी डेटा आहे, जितका जास्त आणि शुद्ध डेटा आपण दिला, तितके चांगले आणि विश्र्वासार्ह परिणाम आपल्याला मिळणार आहे. त्यामुळे पत्रकारांनी फॅक्ट चेकिंग, ट्रान्सलेशन, कंटेंट प्रेझेंटेशन यांसारख्या बाबतीत ‘एआय’ टूल्सचा अभ्यास करावा.

आज इलेक्ट्रॉनिक मीडियामध्ये ‘एआय’च्या मदतीने व्हॉइसओव्हर, स्क्रिप्टिंग, व्हिडिओ तयार करणे अशा अनेक गोष्टी शक्य झाल्या आहेत. मात्र, ‘एआय’ कितीही प्रगत झाले तरी मानवी संवेदनशीलता आणि विचारशक्ती अपरिहार्य असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. मंत्रालय व विधिमंडळ वार्ताहर संघाचे सरचिटणीस दीपक भातुसे यांनी सूत्रसंचालन केले.

## रेलवन सुपर ॲप - रेल्वे प्रवाशांसाठी वन-स्टॉप डिजिटल कंपॅनियन

**सोलापूर/प्रतिनिधी** : भारतीय रेल्वेने नवीन पिढीचे डिजिटल प्लॅटफॉर्म रेलवन सुपर ॲप सादर करून प्रवाशांचा अनुभव वाढवण्याच्या दिशेने आणखी एक मोठे पाऊल उचलले आहे. अनेक प्रवाशांना अखंड सेवा प्रदान करण्यावर लक्ष केंद्रित करून, हे ॲप १ जुलै २०२५ रोजी सेंटर फॉर रेल्वे इन्फॉर्मेशन सिस्टम्स (CRIS) च्या ४० व्या स्थापना दिनानिमित्त नवी दिल्लीतील इंडिया हॅबिटॅट सेंटर येथे लाँच केले गेले.

रेल्वेने प्रवाशांच्या सुविधांमध्ये सुधारणा करण्यासाठी सातत्याने काम केले आहे - आधुनिक गाड्या, स्टेशन पुनर्विकास आणि जुन्या डब्यांचे अत्याधुनिक LHB कोचमध्ये रूपांतर करणे. या प्रवासात, रेलवन एक एकीकृत प्लॅटफॉर्म म्हणून उदयास आले आहे जे रेल्वे सेवांमध्ये प्रवेश सुलभ आणि आधुनिक करते.

ऑल-इन-वन डिजिटल प्लॅटफॉर्म : RailOne हे वापरकर्ता-अनुकूल, सुरक्षित आणि एकात्मिक सुपर ॲप म्हणून डिझाइन केलेले आहे, जे अँड्रॉइड प्ले स्टोअर आणि iOS ॲप स्टोअर दोन्हीवर उपलब्ध आहे, जे वेगवेगळे ॲप्लिकेशन स्थापित न करता अनेक प्रवासी सेवांमध्ये प्रवेश देते. एकात्मिक वैशिष्ट्यांमध्ये हे समाविष्ट आहे:

- आरक्षित तिकीट बुकिंग
- आर-वॉलेट वापरून ३% सवलतीसह अनारक्षित यूटीएस तिकिटे
- लाईव्ह ट्रेन ट्रॅकिंग आणि रिअल-टाइम चौकशी
- ई-केटरिंगद्वारे फुड ऑर्डर
- तक्रार निवारण प्रणाली
- प्लॅटफॉर्म तिकिटे
- तिकीट रद्द करणे
- पीएनआर सेवा

**सोपे लॉगिन आणि सुरक्षित प्लॅटफॉर्म**

- एमपीआयएन किंवा बायोमेट्रिक लॉगिनसह सिंगल-साइन-ऑनला समर्थन देते
- विद्यमान रेलकनेक्ट किंवा यूटीएस ॲप वापरकर्ते थेट लॉग इन करू शकतात
- नवीन वापरकर्ते किमान डेटा एंट्रीसह नोंदणी करू शकतात
- जागा वाचवणारे उपाय - अनेक स्वतंत्र ॲप्सची आवश्यकता नाही


**प्रवाशांना फायदे**

- एका ॲपद्वारे अनेक सेवांमध्ये प्रवेश
- वेळ, प्रयत्न आणि कागदपत्रे वाचवते
- पारदर्शक, आधुनिक आणि प्रतिसाद देणारी प्रणाली
- तक्रारी आणि सेवा विनंत्यांचे जलद निराकरण

**कसे वापरावे**

- प्ले स्टोअर किंवा ॲप स्टोअरवरून रेलवन डाउनलोड करा
- विद्यमान रेलकनेक्ट/यूटीएस क्रेडेन्शियल्स वापरून लॉगिन करा किंवा नवीन वापरकर्ता म्हणून नोंदणी करा
- तिकिटे बुक करणे, ट्रेन ट्रॅक करणे, अन्न ऑर्डर करणे किंवा तक्रारी सबमिट करणे सुरू करा

सोलापूर रेल्वे विभागाचे वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक (सिनिअर डीसीएम) श्री योगेश पाटील म्हणाले




रेलवन ॲप हे प्रवाशांसाठी तांत्रिकदृष्ट्या प्रगत आणि वेळ वाचवणारे प्लॅटफॉर्म आहे. या ॲपद्वारे, तिकीट बुकिंगपासून ते थेट ट्रेनच्या स्थितीपर्यंतची सर्व माहिती फक्त एका क्लिकवर उपलब्ध आहे, ज्यामुळे रेल्वे सेवा जलद, स्मार्ट आणि अधिक विश्वासार्ह बनतात.

## मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागातील पेन्शनधारकांसाठी डिजिटल लाईफ सर्टिफिकेट (जीवन प्रमाण पत्र) शिबिर

**सोलापूर/प्रतिनिधी** : सर्व रेल्वे पेन्शनधारक आणि कुटुंब पेन्शनधारकांना त्यांचे डिजिटल लाईफ सर्टिफिकेट सहज, सोयीस्कर आणि मोफत मिळण्यात मदत व्हावी यासाठी मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागातील विविध प्रमुख स्थानकांवर डिजिटल लाईफ सर्टिफिकेट (जीवन प्रमाण) शिबिराचे आयोजन करत आहे.

या उपक्रमाचे उद्दिष्ट प्रत्येक पेन्शनधारकाला कोणत्याही अडचणीशिवाय त्यांचे लाईफ सर्टिफिकेट वेळेवर मिळावे हेच आहे. ज्यामुळे पेन्शनचे अखंड वितरण सुनिश्र्चित होईल.

**शिबिराचे वेळापत्रक**

**सोलापूर**

स्थळ: परीक्षा हॉल, विभागीय रेल्वे व्यवस्थापक कार्यालय, सोलापूर

दिनांक: १७.११.२०२५ आणि २०.११.२०२५; वेळ: सकाळी १०:०० ते सायंकाळी ५:००

**कुर्डुवाडी**

स्थळ: स्टेशन मॅनेजर ऑफिस, कुर्डुवाडी रेल्वे स्टेशन
दिनांक: १८.११.२०२५; वेळ: सकाळी १०:०० ते सायंकाळी ५:००

**पंढरपूर**

स्थळ: स्टेशन मॅनेजर ऑफिस, पंढरपूर रेल्वे स्टेशन
दिनांक: १९.११.२०२५; वेळ: सकाळी १०:०० ते सायंकाळी ५:००



**लातूर**

स्थळ: स्टेशन मॅनेजर ऑफिस, लातूर रेल्वे स्टेशन
दिनांक: २२.११.२०२५; वेळ: सकाळी १०:०० ते सायंकाळी ५:००

**वाडी**

स्थळ: स्टेशन मॅनेजर ऑफिस, वाडी रेल्वे स्टेशन
दिनांक: २४.११.२०२५; वेळ: सकाळी १०:०० ते सायंकाळी ५:००

**कलबुरगि**

स्थळ: स्टेशन मॅनेजर ऑफिस, कलबुरगि रेल्वे स्टेशन
दिनांक: २५.११.२०२५; वेळ: सकाळी १०:०० ते सायंकाळी ५:००

**आवश्यक कागदपत्रे**

शिबिराला उपस्थित राहणाऱ्या पेन्शनधारकांना खालील कागदपत्रे सोबत आणावी:

१. पेन्शन पेमेंट ऑर्डर (पीपीओ) ची प्रत
२. आधार कार्ड
३. बँक पासबुक (पेन्शन खाते)
४. आधारशी लिंक असलेला मोबाईल फोन (ओटीपी पडताळणीसाठी)

ज्यांनी अद्याप त्यांचे डिजिटल जीवन प्रमाणपत्र सादर केले नाही अशा सर्व पेन्शनधारकांना आणि कुटुंब पेन्शनधारकांना वेळापत्रकानुसार जवळच्या कॅम्प स्थानाला भेट देऊन या सुविधेचा लाभ घेण्याचे आवाहन केले जात आहे.

सोलापूर विभाग आपल्या निवृत्त कर्मचाऱ्यांच्या कल्याणासाठी वचनबद्ध आहे आणि रेल्वे सेवा अधिक सुलभ, पारदर्शक आणि पेन्शनधारक-अनुकूल बनवणारे डिजिटल उपक्रम अवलंबत आहे.

## मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागातील लातुर-कुर्डूवाडी मार्गे नांदेड-हडपसर विशेष गाड्या चालणार

**सोलापूर/प्रतिनिधी** : रेल्वेने नांदेड आणि हडपसर दरम्यान विशेष गाड्या चालवण्याचा निर्णय घेतला आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहेत:-

नांदेड-हडपसर विशेष गाड्या

- ०७६०७ साप्ताहिक विशेष गाड्या दर मंगळवारी १८.११.२०२५ आणि २५.११.२०२५ रोजी नांदेडहून सकाळी ०८:३० वाजता सुटतील आणि त्याच दिवशी रात्री ०९:४० वाजता हडपसर येथे पोहोचतील.
- ०७६०८ साप्ताहिक विशेष गाड्या दर मंगळवारी १८.११.२०२५ आणि २५.११.२०२५ रोजी हडपसर येथून रात्री १०:५० वाजता सुटतील आणि दुसऱ्या दिवशी दुपारी १२:१५ वाजता नांदेड येथे पोहोचतील.

थांबे: पूर्णा, परभणी, गंगाखेड, परळी वैजनाथ, लातूर रोड, लातूर, धाराशिव, बार्शी टाउन, कुर्डुवाडी आणि दौंड.

रचना: १ प्रथम वातानुकूलित, २ वातानुकूलित-II टियर, ६ वातानुकूलित-III टियर, १ वातानुकूलित हॉट बुफे कार, ६ स्लीपर क्लास, ४ सामान्य द्वितीय श्रेणी आणि २ सामानासह ब्रेक व्हॅन. (२२ कोच)




आरक्षण आणि बुकिंग: सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर आणि www.irctc.co.in या वेबसाइटवर विशेष शुल्क आकारून विशेष गाड्यांचे आरक्षण खुले आहे.

अनारक्षित कोच साठी बुकिंग स्थानकांवर बुकिंग काउंटर आणि यूटीएस ॲपद्वारे देखील करता येते.

या विशेष गाड्यांच्या तपशीलवार वेळा आणि थांब्यांसाठी, कृपया www.enquiry.indianrail.gov.in ला भेट द्या किंवा NTES ॲप डाउनलोड करा.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.




शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# एमआरआय मशिन असून धाराशिवच्या रुग्णांना गाठावे लागते सोलापूर किंवा लातूर

धाराशिव (प्रतिनिधी)-मेंदू, मणक्याचे आजार, अंतर्गत अवयवांच्या समस्या आदी आजारांच्या रुग्णांची एमआरआय मशिनद्वारे एमआरआय मशिन अत्यावश्यक असते. येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात ६ कोटी ५० लाख रुपयांची मशिन पावणे दोन महिन्यापूर्वी दाखल झाली आहे. इन्स्टॉलेशनही झाले आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या मंजुरीअभावी मशिन कार्यान्वित होईना झाली आहे. त्यामुळे एमआरआय मशिन असूनही रुग्णांना खासगीत तपासणीसाठी ६ ते ७ हजार रुपये मोजावे लागत आहेत.

जिल्हाभरातील गोरगरीब, कष्टकरी जनतेसाठी मेडिकल शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय हाच पर्याय आहे. बहुतेक उपचार माफक दरात होतात. त्यामुळे सर्वसामान्य रुग्ण मोठ्या प्रमाणात उपचारासाठी येतात. येथे अनेक सोयी-सुविधा उपलब्ध झाल्या आहेत. मात्र, एमआरआय सारखी महत्त्वाची सुविधा नव्हती. मागील वर्षी एमआरआय मशिन मंजूर झाले होते. मात्र, जागा नसल्याचे कारण देत ती मशिन इतर जिल्ह्यात हलवण्याचा घाट घातला होता. त्यामुळे सामाजिक संघटना व नागरिकांकडून त्याचा कडाडून विरोध दर्शवला होता.

त्यानंतर आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांनी फेब्रुवारी महिन्यात मशिन स्थलांतर थांबवून क्रिटिकल केअर युनिट येथे इन्स्टॉल करण्याचा निर्णय घेतला होता.

त्यानंतर साडे सात महिन्याच्या अवधीनंतर म्हणजेच २१ सप्टेंबर रोजी मशिन रुग्णालयात दाखल झालेली आहे. तिचे इन्स्टॉलेशनचे कामही झाले आहे. आता केवळ सार्वजनिक आरोग्य विभागाचा कार्यारंभ आदेश मिळत नसल्याने ती कार्यान्वित होण्यास विलंब लागत आहे.

# अशोक जगदाळे यांच्यासह नगराध्यक्ष, उपनगराध्यक्षाचा काँग्रेस पक्षात प्रवेश

नळदुर्ग(प्रतिनिधी)- नळदुर्ग नगरपालिकेच्या निवडणुकीच्या तोंडावरच शहरातील राजकीय समीकरणात झपाट्याने बदल होत आहे.

नळदुर्ग पालिकेतील जुने सत्ताधारी व मातब्बर नेत्यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केल्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाला हादरा बसला आहे. नळदुर्ग शहरातील राजकीय घडामोडी आतापर्यंत थंड होत्या परंतु नगरपालिकेच्या निवडणुकीच्या प्रक्रियेला सुरुवात झाल्यापासून मोठ्या प्रमाणात घडामोडी घडत आहेत.

अनेक राजकीय समीकरणे तुटत असून तर दुसरी नवीन जोडली जात आहेत.

गत वेळी नगरपालिकेत एक हाती सत्ता असलेले राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य अशोक जगदाळे यांच्यासह माजी नगराध्यक्ष नितीन कासार, माजी उपनगराध्यक्ष शरीफ शेख, माजी नगरसेवक अमृत पुदाले, नवल जाधव, ताजोद्दीन सय्यद, रुकनोद्दीन शेख, दत्ता राठोड,अमोल सुरवसे यांन काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष डॉ. हर्षवर्धन सपकाळ यांच्या हस्ते माजी मंत्री अमित देशमुख यांच्या उपस्थितीत अचानकच



राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट सोडून काँग्रेसमध्ये सोमवारी प्रवेश केला.

दरम्यान काही दिवसांपूर्वीच भाजपच्या नगरसेवकांनी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटात प्रवेश केला होता. त्यावेळी मोठ्या प्रमाणात उलथापालत होईल असे वाटत असतानाच अशोक जगदाळे यांच्यासह बाकीच्या सर्व नेत्यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केल्यामुळे नळदुर्ग शहराच्या राजकारणाला नवीन कलाटणी मिळाली आहे.

# मानवी जीवनात कायद्याचे ज्ञान आवश्यक
## परिचय कार्यक्रमात माजी नगराध्यक्ष पाटील यांचे मत




धाराशिव (प्रतिनिधी)- मानवी जीवन हे समाजात घडते आणि समाजाला सुव्यवस्थित ठेवण्यासाठी असते. कायदा म्हणजे शिक्षा देणारी गोष्ट नव्हे, तर तो अधिकार आणि जबाबदार्‍याही सांगणारा मार्गदर्शक असतो. त्यामुळे मानवी जीवनात कायद्याने ज्ञान आवश्यक असल्याचे मत माजी नगराध्यक्ष नानासाहेब पाटील यांनी व्यक्त केले.

धाराशिव शहरातील डॉ. बापूजी साळुंखे विधी महाविद्यालयात बुधवार, १२ नोव्हेंबर रोजी नवीन शैक्षणिक वर्षातील विद्यार्थ्यांसाठी आयोजित परिचय कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. कायला कृष्णमूर्ती हे होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सहाय्यक पोलीस निरीक्षक सुधीर कराळे उपस्थित होते.

कार्यक्रमात महाविद्यालयातील विद्यार्थी योगेश मोरे यांची प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी परिक्षेतून निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. पुणे येथील आयएलएस लॉ कॉलेज येथे पाच दिवसीय कार्यशाळेत सहभाग नोंदविल्याबद्दल आंचल जानराव, किरण सुरवसे, श्रृती देवगिरे यांचाही सत्कार करण्यात आला. तसेच महाविद्यालयात यावर्षी आयोजित केलेल्या दांडिया स्पर्धेत उत्कृष्ट सादरीकरण करण्यासाठी प्रणिता भोसले व गौरी ढोबळे यांची निवड झाल्याबद्दल त्यांचाही मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांना प्रा. डॉ. नितीन कुंभार, डॉ. इकबाल शहा, प्रा. व्ही. जी. शिंदे यांनी मार्गदर्शन केले. योगेश मोरे यांनी महाविद्यालयातील अनुभव आणि विधी क्षेत्रातील करिअर संधी याबद्दल मार्गदर्शन केले. धाराशिव पोलीस मुख्यालयातील सहाय्यक पोलीस निरीक्षक सुधीर कराळे यांनी कायदा आणि तपास या विषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कायला कृष्ण मूर्ती यांनीही विद्यार्थ्यांचे स्वागत करत मार्गदर्शन केले.

यावेळी महाविद्यालयातील प्रा. डॉ. एस. जे. आंबेकर, प्रा. डॉ. एस. डी. कोल्हे, प्रा. के. पी. शिकारे, प्रा. अमोल कुलकर्णी, प्रा. अनुप कवठाळकर, प्रा. अजित शिंदे यांच्यासह शिक्षकेत्तर कर्मचारी संभाजी बागल, रोहित क्षीरसागर, आतार बशीर, राहुल ओव्हाळ, आकाश कवडे, उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. नितीन कुंभार यांनी केले. सूत्रसंचालन श्रृती देवगिरे यांनी तर आभार प्रा. दीपिका स्वामी यांनी व्यक्त केले. यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी शेतकरी संघटना आंदोलनाच्या पावित्र्यात



धाराशिव (प्रतिनिधी)- धाराशिव जिल्ह्यातील साखर व गुळ उत्पादक कारखानदारांनी चालू वर्षातील एफआरपी जाहीर करून ऊस उत्पादक शेतकऱ्यांना रक्कम द्यावी तसेच खरीप हंगामातील पीकविमा तत्काळ जमा करावा यासह शेतकर्‍यांच्या विविध मागण्यांसाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी याना निवेदन देण्यात आले आहे. मागण्याची दखल न घेतल्यास प्रशासनाविरोधात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही संघटनेने दिला आहे.

निवेदनात म्हटले आहे की, धाराशिव जिल्ह्यातील साखर कारखानदारांनी सर्व नियम धाब्यावर बसवून बेकायदेशीर गाळप सुरू करून ऊस उत्पादक शेतकऱ्यांची चेष्टा केली आहे. ऊसदर न ठरवता गाळप चालू करून शेतकऱ्यांच्या ताटात माती कालवली आहे. आम्ही किती वफादार आहोत हे दाखवण्यासाठी साखर सम्राटांचे बगलबच्चे कारखानदारांच्या दारात शेपूट हलवत आहेत. त्यास प्रशासनही जबाबदार असल्याचा आरोप स्वाभिमानी शेतकरी संघटनेने केला आहे. त्यामुळे १५ नोव्हेंबरपर्यंत प्रतिटन ३५०० रूपये विना कपात ऊसदर जाहीर करावा अन्यथा १७ नोव्हेंबरपासून जिल्ह्यातील सर्व ऊसतोड बंद केली जाईल. ऊस दराबाबत कुठलीही तडजोड केली जाणार नाही. त्याचबरोबर साखर कारखान्यातील वजनकाटे ऑनलाईन करण्यात यावे, त्यावर शेतकरी प्रतिनिधीची स्वाक्षरी घ्यावी असेही स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष रवींद्र इंगळे यांनी निवेदनात म्हटले आहे.

निवेदन देताना स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे पदाधिकारी राजाभाऊ हाके, सचिन टाले, शहाजी सोमवंशी, धनाजी पेंदे, दुर्वास भोजने, तानाजी पाटील, विष्णू काळे, कमलाकर पवार, अभय साळुंके, चंद्रकांत समुद्रे आदी उपस्थित होते.

# कसबे तडवळे येथूल मोटरसायकलची चोरी

ढोकी (प्रतिनिधी)-पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी अमोल अशोक पाटील, वय ३० वर्षे, रा. कसबे तडवळे ता. जि. धाराशिव यांची अंदाजे ५०,००० किंमतीची होंडा कंपनीची युनिकॉर्न मोटरसायकल ही दि.०७.११.२०२५ रोजी कसबे तडवळे येथुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-अमोल पाटील यांनी दि.११.११.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन ढोकी पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.


**लातूर समाचार धाराशिव**

**बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क**

**9422472502**

**9175325708**


# अवैध मद्य विरोधी कारवाई

धाराशिव (प्रतिनिधी)- भुम पोलीस ठाणे अंतर्गत दत्ता रा.कल्याणनगर भुम ता. भुम जि. धाराशिव हेदि.११.११.२०२५ रोजी भुम बसस्थानकाच्या बाजूस अंदाजे २,३०० किंमतीची २३ लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. तर अनिता रा. इंदीरानगर भुम ता.भुम जि. धाराशिव या दि.११.११.२०२५ रोजी नगरपालिकेच्या गाळ्या समोर भुम येथे अंदाजे २,२०० किंमतीची २२ लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये भुम पो ठाणे येथे स्वतंत्र २ गुन्हे नोंदविले आहेत.

येरमाळा पोलीस ठाणे अंतर्गत शिवकुमार रा.सापनाई ता. कळंब जि. धाराशिव हे दि.११.११.२०२५ रोजी हॉटेल बालाजी समोर मोकळ्या जागेत अंदाजे २,७०० किंमतीच्या देशी विदेशी दारुच्या २७ सिलबंद बाटल्या अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेल्या जप्त करण्यात आल्या. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये येरमाळा पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

नळदुर्ग पोलीस ठाणे अंतर्गत दिपक रा. जळकोट ता. तुळजापूर जि. धाराशिव हे दि.११.११.२०२५ रोजी जळकोटवाडी कडे जाणारे रस्त्याचे बाजूला अंदाजे २०,००० किंमतीची २५० लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये नळदुर्ग पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

कळंब पोलीस ठाणे अंतर्गत बालाजी र रा. मस्सा ता. कळंब जि. धाराशिव हे दि.११.११.२०२५ रोजी मस्सा बसस्थानक येथे अंदाजे १,५५० किंमतीच्या देशी विदेशी दारुच्या ३८ सिलबंद बाटल्या अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेल्या जप्त करण्यात आल्या. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये कळंब पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

## १,६६,७५० 'तडजोड शुल्क'वसुल

धाराशिव (प्रतिनिधी)-शहर वाहतुक शाखा व संबंधीत पोलीस ठाण्यांनी महत्त्वाच्या रस्त्यांवर दि.११ नोव्हेंबर रोजी मोटार वाहन कायदा-नियम भंग प्रकरणी एकुण २२५ कारवाया करुन १,६६,७५० 'तडजोड शुल्क'वसुल केले आहे.

# स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या मैदानात संभाजी ब्रिगेड ताकदीने उतरणार-प्रदेशाध्यक्ष अ‍ॅड.मनोज आखरे

धाराशिव (प्रतिनिधी)- आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती, महानगर पालिका, नगरपरिषद, नगर पंचायत या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सर्व निवडणुका संभाजी ब्रिगेड लढणार असल्याचे सूतोवाच नुकत्याच पार पडलेल्या राज्य कार्यकारणी बैठकीमध्ये संभाजी ब्रिगेड अध्यक्ष अ‍ॅड. मनोज आखरे यांनी केले आहे. त्या अनुषंगाने स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका स्थानिक राजकीय परिस्थिती लक्षात घेवून समविचारी पक्षाबरोबर युती-आघाडी किंवा स्वबळावर लढण्याची तयारी संभाजी ब्रिगेडने केली आहे.

संभाजी ब्रिगेडचे राज्यातील सर्व जिल्हाध्यक्ष, तालुकाध्यक्ष यांनी गेल्या अनेक दिवसांपासून या निवडणुकीची तयारी सुरू केली असून शेतकर्‍यांचे प्रश्न घेऊन अनेक आंदोलने केली आहेत. मराठवाड्यासह महाराष्ट्राच्या अनेक जिल्ह्यात अतिवृष्टीने कहर केला असून शेतकर्‍यांच्या तोंडाशी आलेला घास अस्मानी संकटाने हिरावून घेतला आहे. अशा स्थितीत सरकार शेतकर्‍यांची चेष्टा करत आहे. संभाजी ब्रिगेडने झोपलेल्या सरकारला जागे करण्यासाठी लक्षवेध आंदोलन केले. तरीही सरकार झोपेच सोंग करत असल्याचा आरोप अ‍ॅड. आखरे यांनी केला आहे. पुन्हा संभाजी ब्रिगेडने सत्ताधरी आमदार खासदार मंत्र्यांच्या घरासमोर जागरण गोंधळ आंदोलन केले. तरीही सरकारला जाग येत नसल्यामुळे संभाजी ब्रिगेडचे कार्यकर्ते जिल्हा परिषद, पंचायत समितीसह नगर परिषद निवडणुकीत निवडून आणून शेतकर्‍यांचा आवाज बुलंद करून जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी निवडणुकीला सामोरे जात आहेत.

आधीच महागाई, बेरोजगारीने जनता त्रस्त झाली आहे. कापूस, सोयाबीन, कांदा उत्पादक शेतकरी अडचणीत आला आहे. अस्मानी आणि सुलतानी संकटाने पीडलेला बळीराजा कर्जमाफीची वाट पाहत आहे. विधानसभा निवडणुकीत आजच्या सत्ताधारी महायुती सरकारने शेतकर्‍यांचा ७/१२ कोरा करण्याचा शब्द दिला होता मात्र आता योग्य वेळ शोधत आहेत. महाराष्ट्रात दर दिवसाला ३ शेतकरी आत्महत्या करत आहेत. राज्यात महिला सुरक्षित नाहीत, कायदा सुव्यवस्थेचे धिंडवडे निघाले आहेत, सत्ताधारी व विरोधी पक्ष गुंडांचे पालन पोषण करण्यात दंग आहेत. आता राजकीय पक्ष म्हणून खर्‍या अर्थाने फक्त संभाजी ब्रिगेडच जनतेचा आवाज होऊ शकते अशी परिस्थिती आहे. या वेळी महाराष्ट्रातील मतदार नक्कीच संभाजी ब्रिगेड ला पसंती देईल असा आम्हाल विश्वास आहे. स्थानिक राजकीय परिस्थिती नुसार समविचारी पक्षां बरोबर युती - आघाडी करून या निवडणूका लढण्यासाठी संभाजी ब्रिगेड सज्ज झाली असल्याचे जिल्हाध्यक्ष अ‍ॅड. तानाजी चौधरी यांनी सांगितले.

धाराशिव, कळंब भूम, परंडा आणि वाशी येथील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत संभाजी ब्रिगेडच्या वतीने निवडणूक लढण्यास तयार असलेल्या ईच्छुकांनी संभाजी ब्रिगेडचे प्रदेश संघटक अतुल गायकवाड आणि माजी जिल्हाध्यक्ष अ‍ॅड. तानाजी चौधरी यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.

## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२१४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४

हे पत्र मुद्रक,प्रकाशक, संपादक व मालक दयानंद शंकरराव जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून समर्थनगर उस्मानाबाद येथे प्रकाशित केले. मो.नं.९४२२४७२५०२

Latur Samachar Printed & Published by Jade Dayanand Shankar , Printed at Jade Offset Printers,Mitra Nagar Latur. and Published at Samarthnagar,Dharashiv (Osmanabad) Editor : Jade Dayanand Shankar Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649